cmyk

## संपादकीय

### मेहुल चोक्सीला त्याच्या कर्माचे फळ द्यावे

पंजाब नॅशनल बँकेत कोट्यवधींचा घोटाळा करणाऱ्या मेहुल चोक्सी याच्या प्रत्यार्पणाची विनंती भारताने केल्यानंतर बेल्जियम पोलिसांनी त्याला अटक केली. कोट्यावधींचा कर्ज घोटाळा करून तो पळाला होता. १३ हजार ५०० कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप मेहुल चोक्सी आणि त्याचा भाचा नीरव मोदीवर आहे. ईडी आणि सीबीआयने त्याला 'वॉण्टेड' जाहीर केले होते. काही दिवसांपूर्वी चोक्सी आजारी असल्याची माहिती समोर आली होती.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३५२ | गुरूवार, दि.१७ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### मुंबई–मनमाड पंचवटी एक्सप्रेसमध्ये एटीएम सुविधा

भारतातील रेल्वे प्रवास आता अधिक आधुनिक आणि सोयीस्कर होत चालला आहे. त्यातीलच एक पुढचे पाऊल म्हणजे मुंबई–मनमाड पंचवटी एक्सप्रेस ही भारतातील पहिली एटीएम ट्रेन बनली आहे. या ट्रेनमध्ये प्रवाशांसाठी ऑनबोर्ड ची सुविधा देण्यात आली आहे. या अनोख्या उपक्रमामुळे आता प्रवासी ट्रेनमध्ये प्रवास करतानाही रोख रक्कम काढू शकतील तसेच चेकबुक मागवणे आणि बँक खात्याचे विवरण अशा एटीएम मशिनद्वारे मिळणाऱ्या बँकिंग सेवा देखील मिळणार आहेत. भारतीय रेल्वे आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही सेवा सुरू करण्यात आली असून, यामागील उद्दिष्ट प्रवाशांना अधिक सुविधा देणे आणि रेल्वेच्या बिगर–तिकीट उत्पन्नात वाढ करणे हे आहे. ही सुविधा पंचवटी एक्सप्रेससोबतच मुंबई–हिंगोली जनशताब्दी एक्सप्रेसमधील प्रवाशांनाही उपलब्ध होणार आहे.

# सरकार यंदा ३१ दशलक्ष टन गहू खरेदी करणार

## अन्न मंत्रालयाची माहिती, उत्पादन चांगले राहण्याचा अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

१ एप्रिल २०२५ पासून यंदाच्या पणन वर्षाची सुरुवात झाली. केंद्र सरकारने यंदा ३१ दशलक्ष टन गहू खरेदीचं उद्दिष्ट निश्चित केले आहे, अशी माहिती अन्न मंत्रालयाकडून समोर आली आहे. यामध्ये २० दशलक्ष टन गहू खरेदी पंजाब आणि हरियाणा या प्रमुख राज्यांतून खरेदीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. तर उर्वरित ११ दशलक्ष टन अन्य गहू उत्पादक राज्यांकडून येईल, अशी अपेक्षा केंद्र सरकारला आहे. दरम्यान, केंद्र सरकारने आत्तापर्यंत ६ दशलक्ष टन गहू खरेदी केला आहे.



कृषी मंत्रालयाने २०२४–२५ या वर्षात ११५ दशलक्ष टन गहू उत्पादनाचा विक्रमी अंदाज व्यक्त केला आहे. परंतु यंदाचे खरेदी उद्दिष्ट मागील वर्षांच्या तुलनेत कमी आहे. सध्यातरी सर्वाधिक खरेदी मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशातून झाली आहे. पंजाब आणि हरियाणामधील खरेदी लवकरच गती घेईल, अशी चर्चा आहे. त्यामुळे गहू उत्पादन भरपूर होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. २०२४–२५ मध्ये सरकारने ३० ते ३२ दशलक्ष टन गहू खरेदीचं उद्दिष्ट ठेवलं होतं. परंतु २६.६ दशलक्ष ◀◀ पान २ वर

### ३२ दशलक्ष हेक्टरवर गहू लागवड

कृषी मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, देशात सुमारे ३२ दशलक्ष हेक्टरवर गहू लागवड झाली आहे. त्यापैकी ३८ टक्के क्षेत्रातील गव्हाची कापणी पूर्ण झाली आहे. तसेच उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि बिहारमध्ये पीक स्थिती चांगली आहे. २०२३ मध्ये उष्णतेच्या लाटेचा गहू उत्पादनावर झाला होता. त्यातून शेतकऱ्यांचे उत्पादन घटले होते.

# बीड जिल्ह्यात १९१ कोटींची 'सीआयआयआयटी'

## 'टाटा टेक्नॉलॉजी'कडून उपमुख्यमंत्री अजित पवारांना पत्र

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील विद्यार्थी, युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनविण्यासह रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अॅन्ड ट्रेनींग' अर्थात (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी केल्यानंतर अवघ्या दोन आठवड्यांच्या आतच 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयटी' स्थापन



करण्याचा निर्णय घेतला आहे. तशा आशयाचे पत्र कंपनीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविले आहे. नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाईल, त्यातून

#### दरवर्षी सुमारे ७ हजार युवकांना प्रशिक्षण

'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने 'सीआयआयआयटी' स्थापन केल्यानंतर दरवर्षी सुमारे ७ हजार युवकांना उद्योगांच्या (४.०) गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना त्यांच्या गरजेनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल तसेच युवकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रोजगार मिळवणे, स्वयंरोजगार करणे शक्य होणार आहे.

#### 'टाटा टेक्नॉलॉजी' अन् जिल्हा प्रशासन उचलणार खर्च

'सीआयआयआयटी'च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून उचलणार आहेत. यामुळे बीड जिल्ह्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल. त्यांची कौशल्यवृद्धी होईल. यातून जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून जिल्हावासियांच्या अजित पवार यांच्याकडून अनेक अपेक्षा आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार त्या अपेक्षांवर खरे उतरताना दिसत आहेत. पालकमंत्री म्हणून आजित ◀◀ पान २ वर

### श्री ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचे अल्पसंख्यांक प्रमाणपत्र रद्द

#### औरंगाबाद खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निकाल

**बीड । प्रतिनिधी**

येथील किल्ले धारूर तालुक्यातील श्री ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थे अंतर्गत चालणाऱ्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळा या अल्पसंख्यांक प्रमाणपत्राचा लाभ घेत होत्या सदर लाभाचं अल्पसंख्यांक प्रमाणपत्र संस्थेने सन १९९२ साली सरकारची दिशाभूल करून बीड येथील शिक्षण विभागाशी हात मिळवणी करुन शिक्षण उपसंचालक विभाग औरंगाबाद यांच्याकडून अल्पसंख्यांक प्रमाणपत्र मिळवले होते ते अल्पसंख्यांक प्रमाणपत्रामुळे संस्थे अंतर्गत शाळा महाविद्यालयात जागा भरतांना बिंदू नामावलीचा अवलंब होत नव्हता सरकारचे कोणतेही नियम पाळत नव्हते संस्था या प्रमाणपत्राच्या नावाखाली मनमानी कारभार चालवत होती त्यांच्या या मनमानी कारभारा विरुद्ध श्री ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थे अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या प्राथमिक / माध्यमिक शाळेतील शिक्षक श्री किसनराव सातपुते यांनी आवाज उचलला व या संस्थेने बेकायदेशीर मिळवलेल्या अल्पसंख्यांक प्रमाणपत्रा विरुद्ध शिक्षण अधिकारी बीड यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या त्या तक्रारी वरुन झालेल्या चौकशीत प्रमाणपत्र खोटं असल्याचे निदर्शनास आले यावरून शिक्षण उप संचालक औरंगाबाद यांनी हे अल्पसंख्यांक ◀◀ पान २ वर



### नारायण फपाळ याला ३ दिवसांची पोलीस कोठडी

माजलगावः माजलगाव शहरात भर रस्त्यावर भाजप सरचिटणीस बाबासाहेब प्रभाकर आगे यांचा मंगळवारी (दि.१५) निर्घृण खून करण्यात आला होता. या प्रकरणी आरोपी नारायण शंकर फपाळ यास अटक केली होती. त्याला बुधवारी (दि.१६) प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांच्यासमोर हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

मंगळवारी दुपारी दोनच्या सुमारास स्वामी समर्थ मंदिरा पाठीमागे रस्त्यावर भाजप कार्यालयासमोर बाबासाहेब उभे होते. यावेळी तेथे आरोपी नारायण याने बाबासाहेब यांच्यावर कोयत्याने सपासप वार करून ◀◀ पान २ वर

## जिल्ह्यात उद्योगासाठी पोषक वातावरण तयार करा– उद्योगमंत्री उदय सामंत

### जिल्हा गुंतवणूक परिषदेला उत्तम प्रतिसाद, ९३० कोटीचा सामंजस्य करार



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात अधिक गुंतवणूक व्हावी यासाठी उद्योग विभागाने प्रयत्न करावेत तसेच मुख्यमंत्री रोजगार योजनेचे उद्दिष्ट पूर्ण होईल यासाठी काम करावे, असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत केले. बुधवारी त्यांच्या उपस्थितीत ९३० कोटी ११ लाख रुपयांचे करार झाले.

उद्योग संचालनालय, जिल्हा उद्योग केंद्र तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मैत्री आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्तरीत्या या परिषदेचे आयोजन केले होते. येथील एका हॉटेलमध्ये ही परिषद ◀◀ पान २ वर

### सोनिया, राहुल गांधीवरील ईडीची कारवाई राजकीय सुडबुद्धीने

## काँग्रेस डगमगणार नाही, दंगलींच्या आडून महाराष्ट्र लुटण्याचे षडयंत्र

### काँग्रेस नेत्यांचा नागपूरच्या सद्भावना यात्रेतून सरकारवर हल्लाबोल



**नागपूर । प्रतिनिधी**

**भाजपा सरकारच्या विरोधात निर्भिडपणे उभे राहणाऱ्या काँग्रेसच्या देशभरातील नेत्यांवर मोदी सरकार कारवाई करत आहे. काँग्रेस नेत्यांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी व खासदार राहुल गांधी यांच्यावर राजकीय सुडबुद्धीने ईडीची कारवाई करण्यात आली असून, त्यांना नाहक त्रास दिला जात आहे. याआधीही ईडीने सोनिया व राहुल यांची चौकशी केली आहे. काँग्रेस पक्ष ईडी, सीबीआयच्या कारवायांना घाबरत नाही. काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता एकजूट होऊन या कारवाईचा निषेध करेल, असे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी म्हटले.**

नागपूर शहरात सामाजिक सौहार्द व शांतता नांदावी यासाठी काँग्रेसने सद्भावना शांती मार्च काढला. यावेळी दिक्षाभूमी, ताजुद्दीन बाबा व टेकडी गणेश मंदिरात दर्शन घेऊन सद्भावनेचे साकडे घालण्यात आले. या मोर्चात प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते विजय वडेट्टीवार, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, अखिल ◀◀ पान २ वर

## युद्धपातळीवर काम करून जिल्ह्यातील बीएसएनएल सेवामध्ये सुधारणा करा-खा.बजरंग सोनवणे



**आहिल्यानगर । प्रतिनिधी**

**बीड व आहिल्यानगर जिल्ह्यातील बीएसएनएलच्या सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आज आहिल्यानगर येथे झालेल्या जिल्हा दूरसंचार समितीच्या बैठकीत समितीचे अध्यक्ष खासदार बजरंग सोनवणे यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत फटकारले. "युद्धपातळीवर काम करा, नाहीतर जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होईल," असा इशारा दिला.**

या बैठकीस आहिल्यानगर लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके, बीएसएनएलचे महाप्रबंधक राजेंद्रसिंग चोंगड, बीडचे सहमहाप्रबंधक बी. एस. अनारे, नगर विभागाचे श्री. वाघ, ए.ए. कुलकर्णी, प्रशांत सिंग तसेच राजू थोरात, दीपक जोशी, व्ही. बी. जोशी, अनंत्रे, दिनेश मालू, विजय पिंपरकर, योगेश सुले आदी अधिकारी उपस्थित होते. खासदार सोनवणे यांनी यापूर्वी ४६१ गावांना बीएसएनल नेटवर्क येत नसल्यामुळे अशा गावांची यादी करुन तिथे ४जी टॉवर उभे करण्याच्या कामास मंजुरी मिळविली होती. यातील अद्याप सेवावंचित असलेल्या गावांमध्ये तातडीने ४जी टॉवर्स उभे करून सेवा सुरू करण्याचे आदेश त्यांनी दिले. जिल्ह्यातील सर्वच गावांना ऑप्टिकल फायबर नेटवर्कद्वारे जोडण्यावरही भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. डिजिटल भारत निधी योजनेअंतर्गत सर्व शासकीय कार्यालये, शासकीय अनुदानित संस्था, बँका इत्यादींना बीएसएनएल ४जी व ब्रॉडबँड सेवा देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. विशेषतः ज्या गावांत ४जी सेवा आधीपासून आहे, त्या ठिकाणी सुविधा अपग्रेड करून ५जी सेवा देण्यासाठी ◀◀ पान २ वर

## इडीच्या विरोधात बीड जिल्हा काँग्रेसची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने




**बीड । प्रतिनिधी**

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात काँग्रेस पक्षाच्या नेत्या मा. सोनियाजी गांधी व राहुलजी गांधी यांच्या विरोधात चुकीचे चार्जशीट दाखल करत जाणीवपुर्वक गांधी व काँग्रेस परिवाराच्या विरोधात ई डी ला पुढे करुन भारतीय जनता पार्टीचे हे जुलमी सरकार षडयंत्र रचत असुन या विरोधात आज जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, प्रदेश सरचिटणीस अमर खानापुरे, गणेश बजगुडे, श्रीनिवास बेदरे, बाळासाहेब ठोंबरे, गणेश राउत, परवेज कुरेशी, महेश बेदरे, मोहसीन शेख, आकाश मस्के, आशिष सोनवणे, सफदार देशमुख, विष्णु मस्के, अमोल पाठक, रामधन जमाले, हनुमान घोडके, अॅड. विलास मस्के, नितीन जयभय, गणेश जवकर, कादर बाबामिया, शेख जहीर, शेख जमील, शेख खमरोद्दीन आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ४१.५० क्विंटल | २,४४१ | २,९०० | २,६८४ |
| ज्वारी/हायब्रिड: २०२.०० क्विंटल | १,७९१ | २,८०० | २,३१० |
| मका/लोकल:५०.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| तूर : ८.५० क्विंटल | ६,८५१ | ७,०४० | ६,९२२ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ३८.५० क्विंटल | २,१५१ | २,८०१ | २,४३० |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन:१४.५० क्विंटल | ४,४११ | ४,४११ | ४,४११ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,३५० | ५,३५० | ५,३५० |

# हिंदूच्या धार्मिक ट्रस्टमध्ये मुस्लिमांना स्थान देणार का?

## सुप्रीम कोर्टाची केंद्राला विचारणा, देशभरातील हिंसाचाराबद्दल चिंता

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**केंद्र सरकारच्या वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध बुधवारी (दि.१६) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. केंद्र सरकार मुस्लिमांना हिंदू धार्मिक ट्रस्टचा भाग बनण्याची परवानगी देण्यास तयार आहे का? अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली. तसेच वक्फ कायद्याच्या निषेधार्थ देशभरात होत असलेल्या हिंसाचाराबद्दल सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी चिंता व्यक्त केली. दरम्यान, सुनावणी तहकूब करण्यात आली असून, आता गुरुवारीही (दि.१७) युक्तीवाद सुरू ठेवण्याचा निर्णय न्यायालयाने घेतला आहे.**



वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात १०० हून अधिक याचिका दाखल झाल्या होत्या. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार, केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. केंद्राच्या वतीने सॉलिसिटर जनरल (एसजी) तुषार मेहता युक्तिवाद करत आहेत. तर कपिल सिब्बल, राजीव धवन, अभिषेक मनु सिंघवी, सीयू सिंग हे कायद्याच्या विरोधात युक्तिवाद करत आहेत. आज अपीलकर्त्यांनी प्रामुख्याने वक्फ बोर्डाची स्थापना, जुन्या वक्फ मालमत्तेची नोंदणी, बोर्ड सदस्यांमध्ये बिगर मुस्लिमांचा समावेश आणि वादांचे निराकरण यावर युक्तिवाद केला आहे. युक्तीवाद करताना अपीलकर्ता कपिल सिब्बल म्हणाले, केवळ मुस्लिमच वक्फ बोर्डाची स्थापना करू शकतात, या कायद्यातील तरतुदीला आम्ही आव्हान देतो. गेल्या ५ वर्षांपासून इस्लाम धर्माचे पालन करणारे लोकच वक्फ निर्माण करू शकतात असे सरकार कसे म्हणू शकते? मी मुस्लिम आहे की नाही आणि ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# मेहुल चोक्सीला त्याच्या कर्माचे फळ द्यावे

पंजाब नॅशनल बँकेत कोट्यवधींचा घोटाळा करणाऱ्या मेहुल चोक्सी याच्या प्रत्यार्पणाची विनंती भारताने केल्यानंतर बेल्जियम पोलिसांनी त्याला अटक केली. कोट्यावधींचा कर्ज घोटाळा करून तो पळाला होता. १३ हजार ५०० कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप मेहुल चोक्सी आणि त्याचा भाचा नीरव मोदीवर आहे. ईडी आणि सीबीआयने त्याला 'वॉण्टेड' जाहीर केले होते. काही दिवसांपूर्वी चोक्सी आजारी असल्याची माहिती समोर आली होती. त्याला कर्करोग झाल्याची शक्यताही वर्तवण्यात आली होती. मेहुल चोक्सीवर नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांच्या कायद्यानुसार फरार आर्थिक गुन्हेगार घोषित केल्यास चोक्सीच्या जप्त केलेल्या साऱ्या संपत्तीवर टाच आणण्याची प्रक्रिया तपास यंत्रणेने सुरू केली आहे. त्यामुळे त्याची आर्थिक कोंडी करणे शक्य होईल. मात्र, चोक्सीने प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देऊन तूर्तास भारतात परतणे शक्य नाही असे त्याच्या याचिकेत म्हटले आहे. त्यामुळे चोक्सी भारतात येण्याची प्रक्रिया लांबू शकते. मेहुल चोक्सीचा पासपोर्ट भारत सरकारने रद्द केला आहे. पीएमएलए न्यायालयात चोक्सीच्या पासपोर्ट निलंबनासंदर्भातील कागदपत्रे आणि त्याच्याविरुद्ध ईडी प्रकरणाच्या तपास फाईल्स मागवण्याचे निर्देशही यापूर्वी देण्यात आले होते. बेल्जियम पोलिसांनी चोक्सीला अटक केल्याने आता त्याच्या प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा झाल्याचे म्हटले जात आहे. सुमारे १४ हजार कोटी रुपयांच्या पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) घोटाळ्यातील आरोपी मेहुल चोक्सीला कर्करोगाची लागण झाली असून, तो बेल्जियममध्ये एका खासगी रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती त्याच्या वकिलांनी फेब्रुवारी महिन्यात मुंबईतील ईडीच्या विशेष न्यायालयात दिली होती. त्यानुसार शनिवारी बेल्जियम पोलिसांनी एका खासगी रुग्णालयातून त्याला अटक केली.

पीएनबी घोटाळ्यातील मुख्य आरोपी नीरव मोदी याचा मेहुल चोक्सी हा मामा आहे. या मामा-भाच्यानी पंजाब नॅशनल बँकेच्या काही उच्चपदस्थ अधिकाऱ्यांशी संगनमत करून बँकेची बनावट हमीपत्रे (लेटर ऑफ अंडरटेकिंग) तयार केली. या बनावट हमीपत्रांच्या सहाय्याने त्यांनी परदेशात बँकांकडून मोठ्या रकमेची कर्जे मिळवली. तसेच परदेशात क्रेडिट सुविधा मिळवून बँकेची सुमारे १४ हजार कोटी रुपयांची फसवणूक केली, असा आरोप आहे. ६५ वर्षीय चोक्सी हा भारतातील गीतांजली जेम्स लि. या कंपनीचा मालक आहे. त्याच्या हिरेजडित दागदागिन्यांची निर्मिती करणारा उद्योग २०१८ मध्ये पीएनबी घोटाळा उघड झाल्यानंतर बंद पडला. त्याच वर्षी चोक्सी भारताबाहेर फरार झाला. सुरुवातीला त्याने अँटिग्वा अँड बर्मुडा या देशाचे नागरिकत्व मिळवले. गतवर्षी तो बेल्जियममध्ये वास्तव्यास आला. भारतीय तपास यंत्रणांना गेली सात वर्षे गुंगारा देणाऱ्या चोक्सीला अटक होण्याची ही पहिलीच वेळ नाही.

या आधी मे २०२१ मध्ये त्याला डोमिनिका देशात बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली होती. तेव्हादेखील भारतीय तपास यंत्रणांनी त्याच्या प्रत्यार्पणासाठी प्रयत्न केले होते. मात्र, डोमिनिकाच्या न्यायालयाने त्याला वैद्यकीय उपचारासाठी पुन्हा ॲन्टिग्वाला जाण्याची परवानगी दिल्याने प्रत्यार्पणाचे प्रयत्न अपयशी ठरले होते. त्यानंतर ईडीने चोक्सीशी संबंधित २ हजार ५०० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली. न्यायालयाने या मालमत्तांचा लिलाव करण्यास परवानगी दिली आहे. चोक्सी भारतातून पळाल्यानंतर काँग्रेस नेत्यांनी भाजपवर तोफा डागल्या होत्या. केंद्रात भाजपचे सरकार होते. भाजपने त्याला पळून जाण्यासाठी मदत केली. सरकारच्या अकार्यक्षमतेमुळे त्याला परत आणणे शक्य होत नसल्याचा दावाही काँग्रेस नेत्यांनी केला होता. चोक्सी भारतातून पळाल्यानंतर काँग्रेसने मोठा गदारोळ केला होता. 'सगळेच मोदी चोर असतात' असे विधान करण्यापर्यंत मजल गेली होती. या विधानाच्या विरोधात राहुल गांधी यांच्या विरोधात खटला दाखल करण्यात आला होता.

भारताने जागतिक महाशक्ती असलेल्या अमेरिकेतून दहशतवादी तहव्वूर राणाला भारतात आणले आहे. त्या तुलनेत चोक्सी याला भारतात आणणे सोपे आहे. कारण त्याला बेल्जियममध्ये अटक झाली आहे. हिरे व्यापारी चोक्सी आणि नीरव मोदी यांनी पीएनबी बँकेला चुना लावून भारताबाहेर पलायन केले. तहव्वूर राणाच्या पाठोपाठ आता चोक्सी आणि नीरव मोदी भारतात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विजय माल्ल्या, मेहुल चोक्सी, नीरव मोदी, ललित मोदी, नितीन संदेसरा या लफडेबाजांच्या मुसक्या बांधून त्यांना भारतात आणले पाहिजे. त्यांनी केलेल्या कर्माचे फळ त्यांना दिलेच पाहिजे.

# ब्लॅकमेल करणारी टोळी पकडली

## दोन महिला,एक पुरुष अटक,स्थानिक गुन्हे शाखा पोलीसची कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

**पुरुषांनी सावधान जालना शहरात ब्लॅकमेल करणारी टोळी सक्रिय झाली असून यासंदर्भात कोणाचे फसवणूक झाल्यास तात्काळ पोलिसांना संपर्क करा असे आवाहन अंबड पोलीस ठाण्याचे विष्णू चव्हाण यांनी केले आहे. या संदर्भात सविस्तर माहिती अशी की एका व्यक्तीला ब्लॅकमेल केल्याप्रकरणी दोन महिला व एक पुरुष यांना पोलिसांनी अटक करून सदरील आरोपींना न्यायालयामध्ये हजर केले असता तिन्ही आरोपींना १९ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.**

जगन्नाथ पांडुरंग नागरे रा. समर्थनगर, यांनी सांगितले की, मागील १० दिवसांपुर्वी एका अनोळखी महिलेस अंबड चौफुली ते पाण्याची टाकी दरम्यान मोटार सायकलवर लिफ्ट दिली होती. त्यावेळी सदर महिलेने ती सर्व प्रकारचे आयुर्वेदीक औषध विक्री करीत असल्याचे माहिती नागरे यांना सांगितले. त्यामुळे फिर्यादी जगन्नाथ नागरे याने लिव्हरचे आयुर्वेदीक औषध देणेबाबत सदर महिलेस कॉल करुन सांगितले. त्यानुसार महिलेने फिर्यादी यास दिनांक १४/०४/२०२५ रोजी अंबड येथे घरी बोलावले. औषध देण्याच्या बहाण्याने त्यास घरात बोलावले व एक पुरुष व एक महिला साथीदाराने पांडुरंग नागरे यास कपडे काढायला लावुन त्याचे अर्धनग्न फोटो काढून रु.३,५०,०००/-देवुन प्रकरण मिटव नाहीतर त्याचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देवून ब्लॅकमेल केल्याने फिर्यादी याने त्याचे बैंक खात्यातून आरोपी महिलेच्या खात्यावर रु.१,००,०००/- रुपये फोन पे द्वारे पाठविले व रु.२,५०,०००/- रुपयांचा चेक आरोपो महिलेस दिला व चेक क्लिअर होईपावेतो फिर्यादी याची सोन्याची अंगठी व आधार कार्ड आरोपी महिलेने स्वतःजवळ ठेवुन घेतले असुन चेक क्लिअर न झाल्याने आरोपी महिला व पुरुष फिर्यादी याकडे रु.२,५०,०००/- ची मागणी करून पैसे न दिल्यास फिर्यादीचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देवुन ब्लॅकमेल करीत असलेबाबत सांगितले. यावरून फिर्यादीची तक्रार ऐकुन मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांनी पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना एक पथक तयार करुन आरोपीस ताब्यात घेणेबाबत सुचना दिल्या. त्यानुसार आरोपी महिला व पुरुष अंबड चौफुली, जालना येथे रु.२,५०,०००/- घेण्यासाठी येणार असल्याचे कळाल्याने अंबड चौफुली, जालना भागात सापळा रचुन १६:१५ वाजेच्या सुमारास आरोपी महिला वय-३२ वर्ष, व्यवसाय-औषध विक्रेता रा.अंबड जि. जालना व आरोपी गोकर्ण पंडीतराव जोशी, वय-३५ वर्ष, व्यवसाय शेती/प्लॉटींग ब्रोकर, रा. शिवाजीनगर, ता. अंबड जि. जालना यास ताब्यात घेवुन त्यांच्या ताब्यातुन फिर्यादी याचा रु.२,५०,०००/- चा चेक, फिर्यादीची रु.२०,०००/-किंमतीची सोन्याची अंगठी, आरोपीची रु.४,००,०००/- किंमतीची मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार, आरोपीतांचे रु.२०,०००/- किमतीचे दोन मोबाईल असा एकूण रुपये ४,४०,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यानंतर दुसरी महिला वय-३२ वर्ष, व्यवसाय-गृहिणी, रा. अंबड हिस सुध्दा ताब्यात घेण्यात आले असून तीनही आरोपी विरुध्द अंबड पोलीस ठाणे, जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांच्या सूचनावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, पोउपनि श्री. राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, संभाजी तनपुरे, कैलास खार्डे, सागर बाविस्कर, देविदास भोजने, भागवत खरात, रमेश काळे, रेणुका बांडे, कविता काकस सर्व स्थागुशा पथकाने कारवाई केली.

# कर्ज मंजुरीच्या ३२५ प्रस्तावाचे उद्दिष्ट पण २६३ प्रकरण मंजूर

**जालना । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यासाठी सन २०२४-२५ वर्षाकरिता दिलेल्या ६२८ कर्ज मंजुरीच्या उद्दिष्टापैकी जिल्हा उद्योग केंद्र या कार्यालयाचे ११९४ कर्ज प्रस्ताव बँकेकडे शिफारस करण्यात आले त्यात २६३ कर्ज प्रस्तावांना बँकांनी मंजुरी दिलेली आहे. तसेच जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळ या कार्यालयाचे ४२६ कर्ज प्रस्ताव बँकांकडे शिफारस करण्यात आले होते. यामध्ये ६२ कर्ज प्रस्तावांना बँकांनी मंजुरी दिलेली आहे, असे एकूण ३२५ कर्ज मंजुरीचे (५१.७५%) उद्दिष्ट साध्य झाले आहे, अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर यांनी दिली आहे.**

सदर योजना अंतर्गत अनुसूचित जातीच्या ४०, अनुसूचित जमातीच्या ४, इतर मागास प्रवर्गातील ११५ व खुल्या प्रवर्गातील १६६ लाभार्थ्यांना कर्ज मंजूर झाले आहे. तसेच १९७ पुरुषांना व १२८ महिलांना या योजनेचा लाभ प्राप्त झाला आहे. ग्रामीण भागातील २३० व शहरी भागातील ९५ लाभार्थ्यांना सदर योजनेत कर्ज मंजूर झाले आहे. कर्ज मंजुरीचे हे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता स्टेट बँक ऑफ इंडिया (७०), महाराष्ट्र ग्रामीण बँक (६३), बँक ऑफ महाराष्ट्र (४५), व कोटक महिंद्रा बँक (३४) या बँकांचे सहकार्य लाभले आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता प्राप्त १ हजार ३०० प्रकरणांचे उद्दिष्ट पूर्तीसाठी ग्रामीण व शहरी तरुणांनी जास्तीत जास्त अर्ज योजनेच्या संकेतस्थळावर (www.maha-cmegp.gov.in) ऑनलाईन पद्धतीने भरावेत तसेच जिल्ह्यातील सर्व बँक व्यवस्थापकांनी अर्ज छाननी करून संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या कर्ज प्रस्तावांना त्वरित कर्ज मंजुरी देऊन उद्दिष्ट पूर्तीसाठी सहकार्य करणे अपेक्षित आहे. राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशिलतेला कालानुरुप वाव देणारी राज्याची महत्वाकांक्षी अशी सर्वसमावेशक योजना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून राज्यात कार्यान्वित करण्यात आली आहे.

# दारुच्या अड्यावर छापा; दारु व गुळ मिश्रीत रसायन जप्त



**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरात कैकाडी मोहल्ला येथे अवैध हातभट्टीची दारु पाडणा-या व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांनी सुचना दिल्या होत्या.**

त्यावरुन मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नीपाणी यांचे मार्गदर्शनाखाली श्री अनंत कुलकर्णी, उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. पंकज जाधव पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांनी कारवाई करण्या बाबत मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने वरील पथकाने जालना शहरातील कैकाडी मोहल्ला येथे जावून या बाबत माहीती काढून, एक महिला वय ४० वर्ष रा. जालना हि खालील साहोत्यासह मिळून आल्याने तिचेकडुन हातभट्टीची दारु तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे रसायण, ड्रम, गावठी असे हातभट्टीची दारु तयार करण्यासाठी उपयोगी पडणारे साहीत्य असा एकुण १,३८०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन पोलीस स्टेशन कदीम जालना येथे कायदेशीर फिर्याद देण्यात आली आहे.सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, श्री. अनंत कुलकणी, उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक व त्यांच्या स्थागुशा पथकाने कारवाई केली.

# ५ गुन्हेगार जिल्ह्यातुन हद्दपार; पोलीस अधीक्षक यांची कार्यवाही

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात गुन्हे करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार हे टोळी तयार करुन बाजार जालना हद्दीतील मुकरम ऊर्फ लाला पिता जुम्मा खान वय ३२ वर्ष रा.तट्टुपुरा जालना , मोहसीनखान वारंवार शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करीत असलेल्या इसमांचे हद्दपार प्रस्ताव पोलीस अधीक्षक कार्यालय जालना येथे प्राप्त झाले होते. त्यावरुन मा. पोलीस अधीक्षक यांनी सुणावणी घेवुन पोलीस ठाणे सदर करण्यात आले आहे.

हुसेन खान वय ३५ वर्ष रा. मोरंडी मोहल्ला, जुना जालना ३) मोहंमद शोएब मोहंमद इद्रीस वय ३२ वर्ष रा. कसबा विठ्ठल मंदीर, जुना जालना यांना एक वर्ष कालावधी साठी जालना जिल्हयातुन ०१ वर्ष कालावधी साठी हद्दपार तसेच पोलीस ठाणे मंठा हद्दीमध्ये टोळीने गुन्हे करणारे मोहसीन ऊर्फ उडीद रहेमत कुरेशी वय २८ वर्ष रा.इंद्रानगर, मंठा ता. मंठा २) अमोल प्रकाश दांडेकर वय २५ वर्ष रा.अशोक सम्राटनगर मंठा यांना ०६ महिने कालावधी साठी जालना जिल्हयातुन हद्दपार केले आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी, श्री. दादाहरी चोरे उपविभागीय पोलीस अधिकारी परतुर व स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक, श्री. संदीप भारती पो.स्टे. सदर बाजार, श्री. आर.डी. निकाळजे पो.नि.पो.स्टे. मंठा, अंमलदार रुस्तुम जैवाळ, सचीन राऊत केलेली आहे.

# डॉ.आवाड यांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात केली आंबेडकर जयंती साजरी



**माजलगाव । प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भारतभर साजरी होत असतांना येथील प्रा. डॉ. मिलींद आवाड यांनी सातासमुद्रापार कोलंबिया विद्यापीठ अमेरिका येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करत अभिवादन केले.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भारतभर मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. माजलगाव येथील कष्टकरी, आदिवासी, अल्पसंख्यांक समाजाचे, फुले - शाहु - आंबेडकर चळवळीचे नेते, मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष कै. एकनाथ आवाड यांचे सुपुत्र माजलगावचे भुमिपुत्र, जेएनयु विद्यापीठ दिल्लीचे प्रा. डॉ. मिलींद आवाड यांनी जगात सर्वात प्रगत राष्ट्? अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात विश्वरत्न, विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्याचा बहुमान त्यांना मिळाला आहे. यावेळी डॉ. आवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर व जीवनपट संदर्भात विस्तृत असे मार्गदर्शन केले. या जयंतीस भारतातील प्रसिध्द भिमशाहीर संभाजी भगत यांनी आंबेडकरी गितांचा जलसा सादर करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र व त्यांच्या जिवन कार्ये गीतांच्या माध्यमातुन सादर करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी अमेरिकेचे स्थानिक आंबेडकरी चळवळीचे विचारवंत उपस्थित होते.

# पान १ वरून...

### सरकार यंदा ३१ दशलक्ष

टन गहू खरेदी केला. तर २०२३ मध्ये ३४.१४ टन गहू खरेदीचं उद्दिष्ट असूनही २६.२ दशलक्ष टन गहू खरेदी करण्यात आली होती. त्यामुळे मागील दोन वर्ष गहू खरेदीचे उद्दिष्ट सरकारला गाठता आले नाही.

----------

### श्री ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचे

फ. रद्द करण्याबाबची शिफारस अल्पसंख्यांक आयोग यांच्याकडे केली आयोगाकडे झालेल्या चौकशीत संस्थेने मिळवलेले अल्पसंख्याक प्रमाणपत्र बोगस ठरल्याने दिनांक ३१- ०३ २०११ ला अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी रद्द केले होते अल्पसंख्यांक विकास महामंडळाच्या या निर्णयाविरुद्ध संस्थाचालकाने मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे अपील दाखल केले होते त्यावर मा. उच्च न्यायालय यांच्याकडे याचिका क्रमांक ८८५२/२०१६ यामध्ये सुनावणी होऊन संस्थेचे अपील मा. खारीज केले आणि अल्पसंख्यांक विभागाने दिलेला निर्णय कायम केला यामुळे बोगस प्रमाणपत्रे घेऊन शासनाची फसणूक करणाऱ्या अल्पसंख्यांक संस्थेच्या कळपात घबराट निर्माण झालेली आहे मा. उच्च न्यायालयात ॲड एस आर केदार खंडपीठ औरंगाबाद यांनी पाहिले आहे .

-------------

### बीड जिल्ह्यात १९१ कोटींची

पवार यांनी २ एप्रिल २०२५ रोजी केलेल्या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यात बीड जिल्ह्यातील युवकांसाठी उद्योग क्षेत्राच्या मदतीने 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनींग' (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्याअनुषंगाने त्यांनी 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीला पत्र लिहून सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्राला 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला असून बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयटी' स्थापन करण्याची तयारी दर्शविली आहे. १९१ कोटींपैकी १५ टक्के म्हणजे ३३ कोटी रुपयांचा खर्च बीड जिल्हा प्रशासन करणार असून, उर्वरीत खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि त्यांच्या भागीदार कंपन्या, संस्था उचलणार आहेत.

-----------

### काँग्रेस डगमगणार नाही,

भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, सुनिल केदार, अनिस अहमद, खासदार प्रतिभा धानोरकर, नागपूर शहर काँग्रेस अध्यक्ष आ. विकास ठाकरे, आ. अभिजित वंजारी, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, इंटकचे प्रदेशाध्यक्ष कैलाश कदम, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी बोलताना रमेश चेन्नीथला पुढे म्हणाले की, जाती धर्माच्या नावावर सुरु असलेला भेदभाव थाबंवण्यासाठी काँग्रेसने सद्भावना यात्रा काढली असून अशा यात्रा राज्यभर काढल्या पाहिजेत. भाजपा जाती धर्माच्या नावाखाली भेदभाव करत आहे. नागपुरात सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत असताना या शहरात हिंसाचार झाला त्याला जबाबदार कोण? मुख्यमंत्री तथा गृहमंत्री नागपूरचे आहेत तरीही त्यांना या घटनेची माहिती कशी मिळाली नाही? गुप्तचर विभागाने त्यांना माहिती दिली होती का? याचे उत्तर द्यावे लागेल आणि दंगलीची चाहुलच लागली नसेल तर हे गुप्तचर विभागाचे अपयश आहे. महाराष्ट्र सरकार, मुख्यमंत्री यांनी या दंगलीची निष्पक्षपातीपणे चौकशी करुन दोषींना शिक्षा केली पाहिजे असेही रमेश चेन्नीथला म्हणाले. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यावेळी म्हणाले की, नागपुरात झालेल्या हिंसाचारावेळी मुख्यमंत्री पोलिसांना फोन करत होते पण पोलीस फोन उचलत नव्हते असे भाजपा आमदार सांगत होते, यातून दंगलीचे प्रायोजक कोण होते हे वेगळे सांगण्याची गरज नाही. राज्य टिकण्यासाठी दंगली घडवल्या जात आहेत व या दंगलींच्या आडून महाराष्ट्र लुटला जात आहे. उद्योगपतींना जमिनी दिल्या जात आहेत. आपल्याला एकजुटतेने सद्भावनेच्या मार्गाने जावे लागणार आहे. संविधानाचा, शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार पुढे घेऊन जायचा आहे आणि राहुल गांधी यांचे 'मोहब्बत की दुकान' उघडायचे आहे. सत्तेसाठी काही लोक भावाभावात, जातीपातीत भांडणे लावत आहेत. सत्तेसाठी अशांतता पसरवणाऱ्यांनी जाती धर्मात, भावा भावात भांडणे लावू नये, असे आवाहनही यावेळी केले. विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यावेळी म्हणाले की, पुरोगामी विचाराने चालवणाऱ्या महाराष्ट्रात आग लावणारे लोक सत्तेत आहेत. औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा उकरून काढत राज्यात तेढ निर्माण करण्याचे काम केले. संविधानाची शपथ घेतलेले मंत्री जाती धर्माच्या नावाने वाद निर्माण करत आहेत. एक मंत्री मशिदीत घुसून मारण्याची धमकी देतो पण मुख्यमंत्री त्यावर काहीच बोलत नाहीत. नागपूर हिंसाचार प्रकरणानंतर एका आरोपीच्या घरावर बुलडोझर चालवून घर पाडले त्याप्रकरणी अधिकाऱ्यांना आता माफी मागावी लागली. सर्वोच्च न्यायालयाने महायुती सरकारचा नपुंसक सरकार असा उल्लेख केला हे लाजीरवाणे आहे, असे वडेट्टीवार म्हणाले. यावेळी माजी मंत्री नितीन राऊत, सुनिल केदार, माणिकराव ठाकरे, अनिस अहमद यांचीही भाषणे झाली.

-----------

### जिल्ह्यात उद्योगासाठी पोषक वातावरण

झाली. जिल्ह्यातील ७४ उद्योजकांनी केलेल्या या करारामुळे थेट तसेच अप्रत्यक्षरित्या ६०३६ जणांना रोजगार प्राप्त होणार आहे. यावेळी व्यासपीठावर खा. संदिपान भुमरे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, एमआयडीसीचे मुख्य अभियंता गावंडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक तसेच अनिल जगताप, राजेश देशमुख, उद्योग सहसंचालक बी. टी. यशवंते, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव, व्यवस्थापक विजय काकड, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी डी.व्ही. फताटे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव इनकर व विश्वमाला इनकर यांनी केले.

---------------

### युद्धपातळीवर काम करून

नियोजन सुरू आहे.

**जलजीवन योजनेमुळे झालेल्या नुकसानीबाबत चर्चा**

बैठकीत जलजीवन योजनेतील पाईपलाईनच्या खोदकामामुळे बीएसएनएलच्या केबल लाईन्सच्या झालेल्या नुकसानीबाबत चर्चा झाली. संबंधित अधिकाऱ्यांनी ही बाब निदर्शनास आणून दिली. यावर खासदार सोनवणे यांनी पंचनामे करून नुकसान भरपाईचे प्रस्ताव जल मंत्रालयाला तत्काळ पाठविण्याचे आदेश दिले.

**कामात दिरंगाई अधिकाऱ्यांना खडसावले**

बैठकीदरम्यान, विभागीय कामात होत असलेल्या दिरंगाईवर खासदार सोनवणे यांनी नाराजी व्यक्त केली. ''गरज असल्यास दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल,'' असा इशाराही त्यांनी दिला. या बैठकीनंतर दूरसंचार विभागात खासदार सोनवणे यांनी घेतलेली ही पहिलीच बैठक गाजल्याची जोरदार चर्चा सुरू होती. या बैठकीतून बीएसएनएलच्या सेवा सुधारण्याची दिशा ठरली असून, नागरिकांना भविष्यात अधिक मजबूत व जलद इंटरनेट सेवा मिळण्याची शक्यता आहे. खासदार बजरंग सोनवणे यांच्या ठाम भूमिकेमुळे प्रशासन आता अधिक सक्रिय होण्याची अपेक्षा आहे.

------------

### हिंदू धार्मिक ट्रस्टमध्ये

म्हणून वक्फ तयार करण्यास पात्र आहे हे राज्य कसे ठरवू शकते?, असा सवालही त्यांनी केला. वक्फची निर्मिती शेकडो वर्षांपूर्वी झाली. आता ते ३०० वर्षे जुन्या मालमत्तेचे वक्फ डीड मागतील. हीच खरी समस्या असल्याचे सिब्बल म्हणाले. फक्त मुस्लिमच बोर्डाचा भाग असू शकतात. नवीन कायद्यानुसार आता हिंदू देखील त्याचा एक भाग असतील. हे अधिकारांचे उल्लंघन आहे. कलम २६ मध्ये म्हटले आहे की, सर्व सदस्य मुस्लिम असतील. येथील २२ पैकी १० मुस्लिम आहेत. आता कायदा लागू झाल्यानंतर, वक्फ डीडशिवाय कोणताही वक्फ तयार करता येणार नाही, असेही सिब्बल यांनी न्यायालयास सांगितले.

------------

### नारायण फपाळ याला ३ दिवसांची

खून केला होता. आपल्या पत्नीशी अनैतिक संबंधाच्या संशयातून नारायणने हा खून केला होता. या घटनेनंतर आरोपी स्वतःहून पोलीस ठाण्यात हजर झाला होता. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सतीश दिंडे करत आहेत. दरम्यान बुधवारी अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्याकडून या प्रकरणाच्या तपासाबाबत अधिक माहिती घेतली.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. १७ एप्रिल २०२५



## आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रविवारी आस्थीरोग तपासणी

बीड:– राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे रविवार दि २० एप्रिल रोजी ११ ते २ या वेळेत आस्थीरोग तपासणी तसेच मनके व सांधे बदली, गुडघे दुखी, पाठ दुखी, कंबर दुखी तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अस्थिरोग असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे.या शिबीरात संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण ६५ हजार रुपये व पुढील खर्चात गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह, आर्थोस्कोपी निदान करण्यात येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील. शिबीरात आस्थिरोग सर्जन डॉ. रोहन धोत्रे व तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेमध्ये राज्यामध्ये सुप्रसिध्द आहे. आनंदऋषीजी रुग्णालयात १ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी, विविध फिल्डमध्ये २५० पेक्षा अधिक डॉक्टर सेवा करत आहेत. आज पर्यंत हजारो अस्थिरोग असणार्या रुग्णांवर उपचार करुन असंख्य रुग्ण या आजारापासून मुक्त झालेले आहेत. आस्थीरोग शिबीरात तपासणी करण्यासाठी नोंदणी फीस केवळ १०० रुपये ठेवण्यात आलेली आहे. नोंदणीसाठी मो. ८२६२००९०९१ यावर संपर्क साधावा. वेळे अभावी नोंदणी करु न शकलेल्या रुग्णांची देखील तपासणी करण्यात येणार आहे.रविवार दि २० एप्रिल रोजी ११ ते २ या वेळेत, अहमदनगर येथील तज्ञ डॉ.रोहन धोत्रे व त्यांचे सहकारी डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे. तरी बीड शहरातील व पंचक्रोषीतील आस्त्रीरोग रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन बीडचे विश्वस्त व समस्त जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

# अंध विद्यार्थी बांधवांचा गावकऱ्यांनी आदर्श घ्यावा

## भीम जयंती उत्सवात प्रा. प्रकाश खळगे यांचे आवाहन

वडवणी । प्रतिनिधी

पिंपरखेड येथील दोन डोळ्यांनी पूर्ण अंध असलेल्या दोन सख्ख्या भावांनी आपल्या बुद्धी आणि कौशल्याच्या बळावर यशस्वी झेप घेतली आहे. मोठा भाऊ संजय यांनी बँकेमध्ये मॅनेजर म्हणून तर लहान भाऊ बाळू याने मंत्रालयात उच्चपदस्थ अधिकारी म्हणून नोकरी मिळवली आहे. अंध असूनही त्यांनी गाजवलेलं कर्तृत्व खूप मोठं आहे. घरच्या हालाखीच्या परिस्थितीचा सामना करीत असतानाही त्यांनी केलेल्या मेहनतीचा आदर्श आपण घ्यावा असे आवाहन प्रा. प्रकाश खळगे सर यांनी केले.



पिंपरखेड येथील छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साही वातावरणामध्ये साजरी करण्यात आली. या संस्कार केंद्रात वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबवून गावातीलच नव्हे तर परिसरातील विद्यार्थ्यांना व सर्व पालकांना नवनवीन प्रेरणा दिली जाते. या वाचनालयाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांनी, पुस्तके वाचून त्या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन आपल्या जीवनामध्ये खूप उंच भरारी घेतलेली आहे. नुकत्याच पिंपरखेड येथील एका मागासवर्गीय समाजातील अंध असणारे संजय अडागळे आणि बाळू अडागळे या दोन्ही भावांनी आपल्या अपंगात्वावर व अंधत्वपणावर मात करून दोन्हीही डोळे परिपूर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना, खूप मोठी प्रेरणा दिलेली आहे. हे भाऊ दोन्ही डोळ्याने पूर्ण अंध असून संजय अडागळे याने सांगली या ठिकाणी मॅनेजर या पदावरची तर त्याचाच दुसरा भाऊ बाळू अडागळे, याने सुद्धा मुंबई महानगरपालिकेमध्ये उप आयुक्त या पदावर आपली नोकरी कायम केलेली आहे. सध्याच्या जमान्यामध्ये मेहनतीला आणि अभ्यासाला खूप महत्त्व आहे. हे दोन्ही भाऊ अतिशय हुशार आहेत. त्यांनी आपल्या स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर रात्रंदिवस अभ्यास करून, परिपूर्ण असणाऱ्या माणसांना एक नवीन दिशा आणि नवीन प्रेरणा देण्याचे काम केलेला आहे.. आत्ताच्या धकाधकीच्या जीवनामध्ये ,,नोकऱ्या मिळवणे चांगल्या चांगल्या, अतिशय हुशार लोकांना कठीण होऊन बसलेले असताना, या दोन अंध विद्यार्थ्यांनी मात्र आपल्या आई आणि वडिलांचे स्वप्न पूर्ण केलेल आहे . अतिशय ग्रामीण भागामध्ये राहून व छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयासारख्या संस्कार केंद्रामध्ये सतत येणं जाणं करून वाचनालयाचे सचिव प्रा. प्रकाश खळगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सतत विचारपूस करून त्यांनी आपल्या जीवनातील संधीचं सोनं केलेलं आहे. या अपंग, अंध विद्यार्थ्यांना, त्यांच्या जीवनामध्ये प्रेरणा मिळावी म्हणून वाचनालयाच्या माध्यमातून त्यांचा फार मोठा सत्कार करून, सन्मान करण्यात आला. त्यांच्या सोबतच त्यांचे आई–वडील त्यांनी कठीण मेहनत करून आपल्या मुलांना कसल्याच प्रकारची अडचण भासू दिली नाही म्हणून त्यांच्या आई–वडिलांचा सुद्धा सन्मान करण्यात आला. त्यामुळे गावातील वातावरण चैतन्यमय झालेलं होत. या सत्कार सोहळ्याला गावातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. या गावातील सर्व विद्यार्थ्यांनी, पालकांनी व परिपूर्ण असणाऱ्या लोकांनी या दोन अंध भावांचा आदर्श घेऊन आपल्या मुलांमध्ये सुद्धा तशी जिद्द निर्माण करावी अशी कळकळीची विनंती प्रा.प्रकाश खळगे सर यांनी केली. आपल्या गावाचा, आपल्या तालुक्याचा, आपल्या जिल्ह्याचा व देशाचा विकास करण्यासाठी, प्रयत्नशील असलं पाहिजे असेही विचार त्यांनी मांडले. यावेळी अतिशय हुशार विद्यार्थिनी कुमारी अनन्या जितेंद्र खळगे हिने ८५ टक्के मार्क घेऊन, प्राविण्य मिळवल्यामुळे तिचा व तिच्या सोबत असणाऱ्या सर्व मैत्रिणींचा सन्मान करण्यात आला.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



माजलगाव । प्रतिनिधी

कार्यक्रमचे अध्यक्ष मा. कांशीराम साळवे सर उद्घाटक कृउबा सचिव मा. हरिभाऊ सवने प्रमुख व्याख्याते मा. बाळासाहेब सोनसळे सर प्रमुख पाहुणे माजी समाज कल्याण सभापती सौ. अनुसया ताई साळुंके, मा. शिवाजी गायकवाड साहेब मा. सत्यनारायण उनवणे रामप्रभु साळुंके , परळी तालुकाप्रमुख मेघराज कांबळे, जाधव सर व सर्व समाज बांधवांच्या वतीने महापुरुषांचे पुजण करून प्रमुख पाहुण्यांचे संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आले

कार्यक्रमाची सुरुवात छोटे मुल श्रेयस ज्ञानेश्वर थेटे व धैर्यशील धनंजय जाधव या दोन मुलाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनावर खुप सुंदर अस व्याख्यान केले त्यांचा सर्वांच्या वतीने सत्कार करण्यात आला प्रमुख व्याख्याते बाळासाहेब सोनसळे सराने विस्तीर्ण असे मार्गदर्शन केले तसेच जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके,कृउबा सचिव हरिभाऊ सवने साहेब यांनी मार्गदर्शन केले आणि अध्यक्षीय भाषण कांशीराम साळवे सर यांनी केले

सुत्रसंचलन माजी क.जिल्हध्यक्ष अशोक वाडेकर सर यांनी केले तसेच आभारप्रदर्शन माजलगाव तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे यांनी केले.या जयंतीचे आयोजन युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, सहदेव खंडागळे, पद्माकर कांबळे, दिलीप सोनवणे,अरविंद खंडागळे, संतोष जाधव, सिताराम सोनवणे, योगेश शिंदे,बंडु सोनवणे ,वसंत वाघमारे,संतोष खंडागळे, आकाश कांबळे,अर्जुन पोहेकर, सचिन वाघमारे,मयूर वाघमारे व समाज बांधवांनी सुंदर अस आयोजन करून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



पाटोदा – संत बाळुदेव महाराज विद्यालय व महिला महाविद्यालयामध्ये आज भारत रत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे मार्गदर्शक संजय कांकरिया, पत्रकार हमीदखान पठाण,मुख्याध्यापक मधुकर बोखारे,प्राचार्य राजेंद्र आविळे, प्राध्यापक विजय जावळे, अंकुश नाईकनवरे, बाबाजी चव्हाण यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेच पूजन करून, अभिवादन केले यावेळी महाविद्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

## राजेवाडी येथील बौध्दविहाराच्या जागेवरील अतिक्रमण तात्काळ हटवा

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील राजेवाडी येथील भीमनगर बौद्धविहाराच्या नियोजीत जागेवर नारायण सोनपसारे यांनी अतिक्रमण करून ताबा घेतला असल्याने ग्रामस्थांनी सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे न्यायासाठी धाव घेतली आहे.



राजेवाडी येथील नारायण संभाजी सोनपसारे यांनी गावातील भीमनगर भागातील बौद्धविहाराची नियोजित जागा हडप करण्याच्या उद्देशाने अतिक्रमण करून घेतली आहे. ग्रामस्थांनी वारंवार तोंडी सूचना दिल्या विनंती केली परंतु नारायण सोनपसारे हे कुनाचंही ऐकायला तयार नसल्याने शेवटी ग्रामस्थांच्या वतीने आर पी आय नेते गंगाधर सोनपसारे बहुजन विकास मोर्चा चे नेते अभिजीत पोटभरे व ग्रामस्थ महादेव सोनपसारे यांनी राजेवाडी येथील सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे धाव घेतली असुन लवकरात लवकर अतिक्रमण हटवुन बौद्धविहाराची जागा ताब्यात घेऊन समाज बांधवांच्या ताब्यात द्यावी अन्यथा उपोषण करण्यात येईल अशा अशयाची निवेदनाव्दारे मागणी करण्यात आली आहे.

## शिक्षण हे परिवर्तनाचे शस्त्र आहे -प्राचार्य सावंत

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथील अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दि.१४ एप्रिल २०२५ रोजी विद्यालयामध्ये करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य सावंत बी.आर.तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य पटाईत सर तसेच श्री.आवारे सर,श्री.डोंगरे सर आदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभ हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व त्यांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल आपले विचार व्यक्त केले तसेच अध्यक्ष समारोपर विचार व्यक्त करताना प्राचार्य सावंत बी.आर.म्हणाले की,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मनाले होते की,शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही शिका– संघटित व्हा– अन्यायाविरुद्ध संघर्ष करा असा मूलमंत्र त्यांनी दिला होता शिक्षण हे परिवर्तनाचे शस्त्र आहे असे बोलून जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी श्री.खळगे सर,श्री.घोडके सर,श्री.राठोड सर,श्रीमती पांचाळ मॅडम,श्रीमती बोचरे मॅडम,प्रा.राहुल थोटे,प्रा.नेमाटे यांच्यासह विद्यालयातील शिक्षक,शिक्षिका,शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमातील उपस्थितांचे आभार प्रा.नितीन बडे सर यांनी मानले.

पान ६ वरुन

## अंगातली ताकद व संपत्तीचा

पुण्य आहे.मोबाईल चांगल्या कामासाठी उपयोगात आणून तरुणांनी व्यसनापासून दूर राहून दंगली–मोर्चापासून अलिप्त राहून शेतकऱ्यांच्या मुलांनी स्वतःसाठी काहीतरी उपजीविकेचे साधन निर्माण करून पोटापाण्याचा प्रश्न सोडवावा असा मौलिक सल्ला दिला.अंगातली ताकद व जवळचा पैसा,संपत्ती संपली तर,तुम्ही जगातून संपलात याची प्रत्येकानी आठवण ठेवून अंगातली ताकद व संपत्तीचा उपयोग योग्य पद्धतीने करावा तसेच कामापेक्षा जास्त संपत्ती कमावणे म्हणजे भावी पिढीला आळशी बनवणे याचे उदाहरणासह पटवून दिले.अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यातील पंगतीत वाढण्याची सेवा महिला वर्गांनी सुद्धा करावी,हे सुद्धा मोठे पुण्य आहे असे ते म्हणाले.या किर्तनाला पंचक्रोशीतील महिला–पुरुष,नवतरुण भाविक–भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होता.


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे निर्माते आहेत: सागर शिंदे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**ज्या महापुरुषांनी देशाच्या उन्नतीचे चिंतन केले त्यात अग्रगण्य स्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. जर युरोपातील लोक एकत्र येऊन राष्ट्र तयार होऊ शकते तर भारत एक राष्ट्र का होऊ शकत नाही? असा सवाल विचारून त्यांनी भारतीय राष्ट्र वादाची येथील जनमानसात पेरणी केली आणि भारताच्या एकसंघतेला पुष्टी दिली त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे निर्माते ठरतात असे प्रतिपादन विवेक विचार मंचाचे महाराष्ट्र राज्य संयोजक सागर शिंदे यांनी केले.**

ते येथील खोलेश्वर महाविद्यालयात अभ्यास मंडळ व एन.एस.एस विभाग यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. मकरंद पत्की हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी, दैनिक सकाळचे पत्रकार तथा महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रशांत बर्दापूरकर , प्राचार्य डॉ. दीपक फुलारी, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य गौतम गायकवाड व डॉ. बिभीषण फड, व्यवसाय शिक्षण विभागाचे उपप्राचार्य डॉ. रवींद्र कुंबेफळकर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य आनंद पाठक आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना सागर शिंदे म्हणाले की, हैदराबाद मुक्तिसंग्रामात देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मोलाचे योगदान आहे. हैदराबाद संस्थानात निजामाने डॉ. आंबेडकरांना येण्यास व भाषण करण्यास बंदी घातली होती परंतु १९३४ सली त्यांनी आजच्या छ. संभाजीनगर जवळील मकरंदपुर येथे सभा घेतली. जी मकरंदपूर परिषद नावाने इतिहासात




प्रसिद्ध आहे. या सभेत त्यांनी निजाम हिंदुस्थानचा शत्रू आहे त्यामुळे आपण हिंदुस्तानच्या बाजूने उभे राहिले पाहिजे असे समाजातील सर्वांना आवाहन केले. त्याचमुळे दलित जनता या मुक्तिसंग्रामात भारताच्या बाजूने उभी राहिली. डॉ. बाबासाहेब यांनी देशासंबंधी च्या अनेक विषयांवरचे चिंतन केलेले होते. कृषी, सुरक्षा, सिंचन,संरक्षण, कायदा, शिक्षण, समाजव्यवस्था, प्रशासन, न्यायव्यवस्था इत्यादी अनेक विषयांवरचे त्यांचे चिंतन मौलिक व मार्गदर्शक ठरणारे आहे. संविधान निर्मिती हे एक डॉ. आंबेडकरांचे देशाप्रती असलेले मोलाचे योगदान आहे. या खंडप्राय देशाला एका सुत्रात बांधण्यासाठी संविधान निर्मिती हा महत्त्वाचा घटक होता आणि अशा संविधानाची निर्मिती करण्याचे आवाहन यशस्वीरित्या डॉ. आंबेडकरांनी पेलले असे प्रतिपादन त्यांनी केले.यावेळी राम कुलकर्णी यांनीही आपले विचार मांडले बोलताना ते म्हणाले की, दीनदुबळ्या दलित समाजाला, समाजाच्या मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे बाबासाहेबांचे मत होते त्यामुळे त्यांनी शिक्षणावर अधिक भर दिला. डॉ. आंबेडकर ही आमची अस्मिता आहे. अशी रत्न आपल्या देशात जन्माला आली हे आपले भाग्यच आहे असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात ॲड. मकरंद पत्की म्हणाले की, डॉ. आंबेडकरांना तत्कालीन परिस्थितीची खूप चांगली जाणीव होती त्यामुळेच त्यांनी बौद्ध,जैन, शीख व हिंदू यांना संघटित ठेवण्यासाठी हिंदू कोड बिल तयार केले होते. त्यात महिलांचे हक्क, मालमत्तेतील हिस्सा इत्यादी अनेक सर्वसामान्यांच्या हक्काविषयीची प्रावधाने केलेली होती तसेच आज चर्चीला जाणारा समान नागरी कायदा हीदेखील डॉ. बाबासाहेबांची मूळ संकल्पना आहे .बाबासाहेबांनी धर्मांतर करण्याचे निश्चित केल्यानंतर अनेक धर्मांनी त्यांना त्यांचा स्वीकार करण्यासाठी प्रलोभने दिली परंतु बाबासाहेबांनी त्या प्रलोभनांना धिक्कारत येथील भारतीय विचारांशी सुसंगत अशा बौद्ध धर्माचा स्वीकार केला व बौद्ध धर्मातील अनेक तत्त्वांचा आपल्या संविधानातही समावेश केला आहे असे सांगून त्यांनी कायदा व सुव्यवस्थेतील डॉ. आंबेडकरांचे मौलिक योगदान प्रतिपादित केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक शैलेश पुराणिक व सौ गौरी पुराणिक यांची कन्या कु. स्वराली पुराणिक हिने डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत सिल्वर मेडल मिळवल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.बी. व्ही. मुंडे व प्रा. डॉ. बाबा कागदे यांची प्रोफेसर पदीपश पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला . याप्रसंगी दैनिक सकाळचे पत्रकार प्रशांत बर्दापूरकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. दीपक फुलारी यांनी केले . भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेचे वाचन प्रा. डॉ. तात्या पुरी यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. अनिता बर्दापूरकर यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी मिटकरी यांनी केले तर आभार प्रा.अनुपमा जाधव यांनी मानले . कार्यक्रमाचा समारोप प्रा.अंजली देशमुख यांनी घेतलेल्या शांती मंत्राने झाला. या कार्यक्रमासाठी प्रसिद्ध साहित्यिक साहेबराव सोनसळे व महाविद्यालयातील शिक्षक– शिक्षकेतर कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

पान ६ वरुन...

## अंबाजोगाई महाराष्ट्रातले तिसरे

आणि माता श्री योगेश्वरी देवी, आद्यकवी मुकुंदराज व सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर विकासासाठी पुढाकार घेणार असे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत बीड येथे बुधवार, दिनांक १६ एप्रिल रोजी जाहीर केल्याचे राजकिशोर मोदी यांनी यावेळी सांगितले. त्याचबरोबर मुकुंदराज समाधी परिसर हे पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करावे व यासाठी वन विभागाकडील पाच एक्कर जागा ही मुकुंदराज संस्थानला उपलब्ध करून देण्याच्या मागणीवर देखील वनमंत्री ना गणेश नाईक यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन यावर देखील सकारात्मक निर्णय घेण्याचा शब्द ना. उदय सामंत यांनी याप्रसंगी दिल्याचे राजकिशोर मोदी यांनी नमूद केले. त्याचबरोबर विवेकसिंधु हा ग्रंथ महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रसिद्ध करून तो ग्रंथ राज्यातील प्रत्येक वाचनालयात ठेवण्याची मागणी जेष्ठ साहित्यिक साळेगावकर यांनी यावेळी केली व ती मागणी देखील उदय सामंत यांनी तात्काळ मान्य केल्याचे मोदी यांनी सांगितले. अंबाजोगाई करांच्या या सर्व मागण्यांची पूर्तता केल्याबद्दल महाराष्ट्राचे सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत, माजी मंत्री दीपक केसरकर व माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे राजकिशोर मोदी व मुकुंदराज संस्थानचे किसन महाराज पवार यांनी समस्त अंबाजोगाईकरांच्या वतीने आभार व्यक्त केले आहेत.

## सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठी

ठेवण्यासाठी स्वतंत्र इमारतीत ग्रंथालय उभारण्यात यावे. अंबाजोगाई येथे मराठी भाषा विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करा. बीड परिसरातील विविध अध्यात्मिक परंपरांचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र अध्यासन केंद्र उभारावे. बीड, माजलगाव, धारूर, पाटोदा, अंबाजोगाई, गेवराई या परिसरातील मठ व मंदिरांच्या परंपरांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास गट स्थापनेची गरज व्यक्त करण्यात आली आहे. पाटांगण मठातील ललित कीर्तन परंपरेचा आणि इतर ठिकाणच्या सांस्कृतिक वारशाचा अभ्यास महत्त्वाचा ठरेल. रामतीर्थ येथील गिरिधर स्वामी, राघवस्वामी व देवस्वामी यांच्या समाधीस्थळांचा जिर्णोद्धार करून तेथे सुशोभीकरण करण्यात यावे. तसेच, संत ज्ञानेश्वर यांचे आजोबा गोविंदपंत यांच्या समाधीस्थळाचा जिर्णोद्धार करणेही आवश्यक आहे. बीडचे शासकीय ग्रंथालय अधिक सुसज्ज आणि आधुनिक करण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली आहे. जिल्ह्यात 'पुस्तकांचे गाव' ही योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात यावी. यावर्षीचे मराठी भाषा संमेलन बीड येथे घ्यावे, अशी विनंती डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केली असून, अशी संधी मिळाल्यास त्यांना आनंद होईल असे त्यांनी नमूद केले. या सर्व मागण्या बीडच्या सांस्कृतिक जडणघडणीसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मंत्री उदय सामंत यांनी या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर

न्यू सिद्धार्थ ग्रुप, नवा मोंढा आणि हमाल मापाडी युनियन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. यातील अल्पोपहार अन्नदान म्हणून ५ क्विंटल खिचडीचे वाटप हा उपक्रम संपूर्ण अंबाजोगाईकरांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. अल्पोपहार म्हणून सर्वांना सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत खिचडी वाटप करण्यात आली. पाणपोईच्या माध्यमातून १००० हजार पिण्याच्या थंड पाण्याचे जार उपलब्ध करून देण्यात आले होते. विशेष म्हणजे शहरात येणाऱ्या सर्व आंबेडकरी अनुयायी यांचेसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यावर्षी ही करण्यात आली होती. सोनबा येवले पानपोईचे हे १२ वे वर्ष होते. मान्यवरांकडून छत्रपती शिवरायांचे अंगरक्षक, वीर लढवय्ये जिवाजी महाले चौकाच्या नामफलकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जयंतीनिमित्त नवा मोंढा येथे भव्य मिरवणुक काढण्यात आली. मोठ्या थाटामाटात आणि आतिषबाजीच्या गजरात आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व महामानवांचे विचार समाजासमोर घेऊन जाणारे आकर्षक नृत्य, प्रबोधनपर देखावे, लेझीम हे पारंपरिक कला प्रकार सादर करण्यात आले. या मिरवणुकीतील देखाव्यांनी लहान मुले, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक, मान्यवर या सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. विशेष म्हणजे सर्व जाती – धर्माच्या लोकभावनांचा आदर करीत सदर मिरवणूक शांततामय वातावरणात काढण्यात आली. जयंती उत्सवाचे सोशल मीडियावरून लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. जयंती उत्सवाच्या निमित्ताने शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्य विषयक जनजागृती व्हावी यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बालासाहेब आदमाने यांनी विशेष प्रयत्न करून शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करणाऱ्या पोलीस प्रशासन, महावितरण, नगरपालिका प्रशासन व ज्ञात अज्ञात सर्वांचे आभार मानले. तर या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वितेसाठी जयंती उत्सव समितीचे सदस्य ॲड.संजय भाऊ साळवे, अरूण भाऊ आदमाने, राजेभाऊ साळवे, बाबासाहेब आदमाने, अशोक सहजराव, जीवन गव्हाणे, अकबर पप्पूलाले गवळी, कासिम गवळी, मनोज सोनवणे, रहीम भाई गवळी, ज्ञानोबा गव्हाणे, रमेश सोनवणे, विठ्ठल मिसाळ, विजय आदमाने, अविनाश साळवे, दादा आदमाने, आकाश साळवे, संजयदादा सरवदे, जीवन गव्हाणे, अकबर पप्पूलाले गवळी, मनोज सोनवणे, आकाश साळवे, बालासाहेब शिंदे, अनिस शेख, गौतम खरात, सुरेश वाघमारे, दिपक गडसिंग, नितीन खलसे, नितिन शेळके, अनिल सहजराव, अशोक मस्के, संकेत मस्के, दादासाहेब जोगदंड, धनराज खलसे, बाळासाहेब धबडगे, गौतम खरात, राजेंद्र खिल्लारे, संदेश पवार, राजेभाऊ वाघमारे, अनिस शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. तर जयंती उत्सवाच्या यशस्वितेसाठी हमाल मापाडी युनियन, अंबाजोगाई आणि न्यू सिद्धार्थ ग्रुप, नवा मोंढा येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य आणि युवकवर्ग यांनी पुढाकार घेतला.

## श्री स्वामी समर्थ सेवा

पूजन, बलिपुर्णाहुती सकाळी ठिक साडे दहा वाजता महानैवेद्य आरतीने सप्ताहाची सांगता येणार आहे. या सप्ताहाच्या कालावधीत प्रश्नोत्तरे, ग्रामाभियान प्रशिक्षण, संपन्न होणार असून श्री गुरुचरित्र पारायण सेवेसाठी तसेच सप्ताहाच्या कालावधीत होणाऱ्या सर्व अध्यात्मिक सेवेत माजलगाव शहरासह तालुक्यातील सर्व साप्ताहिक व दैनिक केंद्रातील सेवेकरी, भाविक भक्त, नागरिक यांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी माजलगाव च्या वतीने करण्यात आले आहे.

## जल व्यवस्थापन कृती

मनोगत उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे व्यक्त केले. सदरील जल व्यवस्थापन कृती पंधरवड्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.याप्रसंगी नायब तहसीलदार सचिन देशपांडे ,गटविकास अधिकारी श्रीमती दिवाने, तालुका कृषी अधिकारी पवार, पाटबंधारे संशोधन उपविभागाचे उपविभागीय अधिकारी एस एम पाटील, यांत्रिकी उपविभागाचे उप अभियंता अशोक रोकडे, अभियंता प्रदीप वरकड, भूषण गायकवाड, श्रीमती प्रीती मुंडे ,तसेच जलसंपदा विभागातील आणि महसूल विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी पाटबंधारे विभाग तथा नोडल अधिकारी अनिल लोंढे यांनी करून आभार मानले.

## चाकरवाडी शिवपुराण कथाच्या

आहे,म्हणून माजलगावकरांच्या वतीने या अन्नदानाची व्यवस्था करण्या संदर्भात दि १५ एप्रिल मंगळवार रोजु माजलगावला महादेव महाराजांच्या अध्यक्षस्थानी बैठक पार पडली या बैठकीत सर्वानुमते सुरेंद्र रेदासनी यांना या शिवकथा समितीच्या माजलगाव अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून या निमित्ताने महादेव महाराजांच्या वतीने माजलगाव येथील माऊली भक्त व शिवभक्तांना आवाहन करण्यात आले आहे,की या कार्यक्रमास सढळ हाताने मदत करुन सहकार्य करावे. माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या पुण्यस्मरणा निमित्ताने हा कार्यक्रम आपल्या बीड जिल्ह्यात आला असुन हा कार्यक्रम भव्य दिव्य होनार असुन यांचा जास्तीत जास्त भक्तांनी लाभ घ्यावा.

## मानवलोकच्या पुढाकारातून

यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रारंभी स्वागत गीत ऐंशी वर्षाच्या सुभद्राबाई यांनी गायिले.प्रास्तविक व संचालन शाम सरवदे यांनी केले संजना आपेट यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी सावित्री सागरे,दिलीप मारवाळ यांनी परिश्रम घेतले.

# हिंगोली बाजारात हळद १४,१०० रुपये क्विंटलवर

हिंगोली : हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत संत नामदेव हळद मार्केटमधील हळदीची आवक वाढली आहे. मार्केटमध्ये हळदीची २१५० क्विंटल आवक होती. हळदीला प्रति क्विंटल किमान ११,६०० ते कमाल १४,१०० रुपये तर सरासरी १२,८५० रुपये दर मिळाले.

हिंगोली बाजार समितीत मार्च महिन्यात नवीन हळदीची आवक सुरू झाली त्या वेळी काही दिवस हळदीचे दर दहा हजार रुपयांच्या खाली गेले होते. त्यामुळे शेतकरी चिंतित झाले होते. परंतु एप्रिलमध्ये दरामध्ये सुधारणा होऊन परत दहा हजारांवर पोहोचल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

गेल्या काही दिवसांपासून हळदीचे सरासरी दर १२ हजार ते १४ हजार रुपयांच्या दरम्यान आहेत. सुट्ट्या असल्यामुळे हळद खरेदी-विक्रीचे व्यवहार बंद राहिले. हळदीची ९५० क्विंटल आवक असताना प्रति क्विंटल किमान ११,४०० ते कमाल १३,९०० रुपये तर सरासरी १२,६५० रुपये दर मिळाले. बुधवारी (दि. १०) हळदीची १९०० क्विंटल आवक असताना प्रति क्विंटल किमान १२ हजार ते कमाल १४,२५० रुपये तर सरासरी १३,१२५ रुपये दर मिळाले. मंगळवारी (दि. ८) हळदीची १८७० क्विंटल आवक असताना प्रति क्विंटल किमान ११,५०० ते कमाल १४ हजार रुपये तर सरासरी १२,७५० रुपये दर मिळाले. हिंगोली जिल्ह्यात २०२४ मध्ये ३२ हजारांवर हेक्टरवर हळद लागवड झाली आहे. गतवर्षीच्या (२०२३) तुलनेत हळदीच्या क्षेत्रात ८ हजारांवर हेक्टरने वाढ झाली. त्यामुळे उत्पादनात वाढ अपेक्षित होती. यंदाच्या हंगामातील हळद काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. विविध कारणांनी हळदीचा उतारा कमी येत असल्याचे अनेक शेतकरी सांगत आहेत. त्यामुळे हळदीच्या दरात तेजी राहील, असा अंदाज जाणकार व्यक्त करत आहेत.



# खरिपात येणाऱ्या किडींना आत्ताच आवरा



गेल्या काही वर्षात रासायनिक कीटकनाशकांचा होणारा अतिरेकी वापर हा किडींचा प्रादुर्भाव वाढण्यास कारणीभूत ठरतो आहे. किडींमध्ये किटकनाशकांबाबत निर्माण झालेली प्रतिकारशक्ती, दुय्यम किडींचा होणारा उद्रेक, मित्र किटकांची कमी होत चाललेली संख्या अशा परिस्थितीत वेळोवेळी शेतात निरीक्षण करून एकात्मिक किड नियंत्रणाचे विविध उपाय करावेत. त्यामुळे अनावश्यक फवारणी आणि त्यावरील खर्चात बचत होते.एकात्मिक कीड नियंत्रणाच्या दृष्टीने पूर्व हंगामी किड नियंत्रण करणे ही कीड नियंत्रणाची प्रभावी पद्धत आहे.

मशागतीमध्ये शेतात पिकाची फेरपालट करणे ही जुनी आणि पारंपारिक पद्धत आहे. त्यामुळे किडींना यजमान वनस्पती न मिळाल्यामुळे किडींचे नैसर्गिकपणे नियंत्रण मिळविण्यास मदत होते. पिकाचा हंगाम संपल्याबरोबर पिकाचे अवशेष, पऱ्हाट्या, तुराट्या यांचा पावसाळ्यापूर्वी वापर करून नष्ट कराव्यात किंवा कंपोस्ट साठी त्याचा वापर करावा. अन्यथा त्यावर किडींच्या विविध अवस्था येऊन पोषक वातावरणात त्यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता राहते. शेताची तीन वर्षातून एकदा खोल नांगरणी करावी. म्हणजे जमिनीत असलेल्या किडींच्या अवस्था जमिनीवर येऊन उन्हामुळे किंवा भक्षक पक्षांद्वारे नष्ट होतील. पहिल्या पावसानंतर शेताच्या बांधावर असलेले तण नष्ट करावे. जेणेकरून किडीची पहिली पिढी तणांवर तयार होऊ शकणार नाही. येत्या खरीप हंगामासाठी तुम्ही जर घरचं बियाणं वापरणार असाल तर बियाण्यास चाळणी लावून किडके, अशक्त बियाणे वेगळे करून त्याची उगवण शक्ती तपासावी आणि त्यानुसार एकरी बियाणे वापरण्याचं प्रमाण ठरवून ठेवावे. उपलब्धतेनुसार कीड, रोग प्रतिकारक वाणाचा वापर करावा. बियाण्याची पेरणी करताना शिफारस केलेल्या अंतरानुसार पिकाची लागवड करावी. कारण पावसात खंड पडल्यास किडींच्या आक्रमणामुळे पिकाची हेक्टरी संख्या कमी होण्याची शक्यता असते. याशिवाय कपाशी आणि इतर पिके हंगामा बाहेर घेणं टाळावं. चांगल्या कुजलेल्या शेणखताचा वापर करावा. माती परीक्षण करूनच खताचा त्याप्रमाणे वापर करावा. नत्र खताचा अतिवापर करणं टाळावं. हंगामात वेळोवेळी आंतरमशागत करावी त्यामुळे किडीला पुरक अशा तणाचा नाश होतो. अशा प्रकारे मशागतीय पद्धतीचा अवलंब करुन पिकातील किडींना आटकाव करणे शक्य होते.

# तुमच्या जमिनीनुसार ठरवा लागवडीसाठी सोयाबीन वाण

खरीपात घेतले जाणारे महत्त्वाचे पीक म्हणजे सोयाबीन. बहुतेक शेतकरी सोयाबीन लागवड करण्याच्या तयारीत असतील आणि त्यासाठी वेगवेगळ्या वाणांचे सोयाबीन बियाणे विकत घेत असतील. जाणून घेऊ जमिनीच्या प्रकारानुसार सोयाबीनच्या कोणत्या वाणाची पेरणी केली पाहिजे.

जमिनीच्या प्रकारानुसार सोयाबीनच्या वाणाची निवड :कृषी तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार शेतकरी बांधवांनी त्यांच्या जमिनीच्या मगदूरानुसार सोयाबीन वाणाची निवड केली पाहिजे.

हलकी जमीन :हलकी जमीन असेल तर ८५ ते ९५ दिवसात कापणीसाठी तयार होणाऱ्या सोयाबीन वाणाची निवड केली पाहिजे. या जमिनीत लागवडीसाठी जे.एस.-९३०५, पी.के. व्ही.-अंबा (पी.के.व्ही ए.एम.एस-१००३९), एम.ए.यु.एस.-७२५, एम.ए.सी.एस. - १४६० आर.व्ही.एस.एम.-१८, एम.ए.यु. एस-१५८, एम. ए.यु.एस.-६१२, जे.एस. -३३५ या सोयाबीनच्या जातींची निवड करावी.

मध्यम जमीन :अशा जमिनीत शेतकऱ्यांनी ९५ ते १०० दिवसात हार्वेस्टिंग साठी तयार होणाऱ्या वाणाची निवड केली पाहिजे.

हलकी ते मध्यम जमीन :अशी जमीन असल्यास जे.एस.- ९३०५, पी.के. व्ही.-अंबा (पी.के.व्ही ए.एम.एस-१००३९), एम.ए.यु.एस.- ७२५, एम.ए.सी.एस.- १४६० आर.व्ही.एस.एम.- १८, एम.ए.यु.एस-१५८, एम. ए.यु.एस.- ६१२, जे.एस. ३३५ या सोयाबीनच्या जातींची निवड करायला काही हरकत नाही.

भारी जमीन :अशा जमिनीत मध्यम ते उशिरा येणारे वाण निवडावे. भारी जमीन असेल आणि शाश्वत पाण्याची उपलब्धता असेल तेव्हाच उशिरा येणाऱ्या वाणाची निवड करावी.

जर भारी जमीन असेल आणि पाण्याची सोय नसेल तर मध्यम कालावधीत हार्वेस्टिंग साठी तयार होणाऱ्या वाणाची निवड करण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. भारी जमिनीसाठी शेतकरी बांधव फुले किमया, फुले संगम, फुले दुर्वा, एम. ए.यु.एस-७१, एम. ए.यु.एस- ६१२, फुले कल्याणी, तसेच पी.के.व्ही.-अंबा (पी.के.व्ही ए.एम.एस -१००३९) या सोयाबीन जातींची निवड करू शकतात.

सोयाबीन वाण लागवडीसंबंधी महत्त्वाची सूचना :शेतकऱ्यांनी आपल्याकडील सर्वच क्षेत्रावर फक्त एका प्रकारचे वाण लावणे टाळावे. म्हणजेच पाच एकर क्षेत्र असेल तर त्यापैकी काही क्षेत्रावर वेगळ्या जातीची आणि काही क्षेत्रावर वेगळ्या जातीची लागवड करावी.

जेणेकरून शेतकर्यांना एका जातीपासून चांगले उत्पादन मिळाले नाही तर दुसर्या जातीपासून चांगले उत्पादन मिळेल.

यामुळे शेतकर्यांना तोटा सहन करावा लागणार नाही. तुम्ही तुमच्या जमिनीच्या मगदूराप्रमाणे तुमच्या क्षेत्रात दोन-तीन प्रकारच्या जातींची लागवड केल्यास तुम्हाला निश्चितच चांगले उत्पादन आणि उत्पन्न मिळू शकणार आहे.



# उन्हाळी कोथिंबीर लागवड तंत्रज्ञान

कोथिंबीरीची लागवड भारतातील बहुतेक सर्व राज्यात केली जाते. कोथिंबीरीच्या विशिष्ट स्वादयुक्त पानांसाठी कोथिंबीरीला वर्षभर मागणी असते. मात्र कोथिंबीरीची लागवड प्रामुख्याने खरीप आणि रब्बी हंगामात केली जाते. उन्हाळी हंगामात कोथिंबीरीचे उत्पादन कमी असले तरी मागणी मात्र भरपूर असते. त्यामुळे कोथिंबीरीच्या लागवडीस चांगला वाव आहे. कोथिंबीर ही रोजच्या आहारात वापरली जाणारी महत्वाची पालेभाजी आहे. कोथिंबीरीच्या विशिष्ठ स्वादयुक्त पानावर इतर भाज्यांचा स्वाद वाढविण्यासाठी शाकाहारी तरी मांसाहारी पदार्थामध्ये कोथिंबीरीचा वापर करण्यात येतो. कोथिंबीरीच्या वडया चटणी आणि कोशिंबीर लोकप्रिय आहे.

हवामान आणि जमीन : कोथिंबीरीची लागवड कोणत्याही प्रकारच्या हवामानात करता येते त्यामुळे अतिपावसाचा प्रदेश वगळता महाराष्ट्रातील हवामानात वर्षभर कोथिंबीरीची लागवड करता येते. उन्हाळयात तापमान ३६ अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास कोथिंबीरीची वाढ कमी होते. कोथिंबीरीच्या पिकासाठी मध्यम कसदार आणि मध्यम खोलीची जमिन निवडावी. सेंद्रिय खते भरपूर प्रमाणात असल्यास हलक्या किंवा भारी जमिनीत कोथिंबीरीचे पिक चांगले येते.

सुधारीत जाती : नंबर ६५ टी ५३६५ एनपीजे १६ व्ही १ व्ही २ आणि को-१, डी-९२ डी-९४ जे २१४ के ४५ या कोथिंबीरीच्या स्थानिक आणि सुधारित जाती आहेत.

लागवडीचा हंगाम

कोथिंबीरीची खरीप, रब्बी आणि उन्हाळी अश



तीनही हंगामात लागवड करतात. उन्हाळी हंगामात एप्रिल ते मे महिन्यात कोथिंबीरीचे उत्पादन घ्यावे.

लागवड पध्दती : कोथिंबीरीच्या लागवडीसाठी शेत उभे-आडवे नांगरुन चांगले भुसभुशीत करून ३२ मिटर आकाराचे सपाट वाफे बांधून घ्यावे. प्रत्येक वाफयात ८ ते १० किलो चांगली कुजलेली शेणखत टाकून मिसळून घ्यावे. वाफे सपाट करुन बी सारखे पडेल या बेताने फेकून पेरावे. बी खत मातीने झाकून हलके पाणी द्यावे. तणांचा प्रार्दुभाव जास्त प्रमाणात होत असल्यास सपाट वाफयांमध्ये १५ ते २० सेमी अंतरावर खुरप्याने उथळ ओळी पाडून बी पेरावे आणि नंतर मातीने झाकून घ्यावे. उन्हाळी हंगामात पेरणीपुर्वी वाफे चांगले भिजवून घ्यावे. आणि वाफसा आल्यावर बियाणे पेरावे. कोथिंबीरीच्या लागवडीसाठी हेक्टरी ६० ते ८० किलो बी लागते. पेरणीपूर्वी बियाण्यांवर चांगली उगवण होण्यासाठी प्रक्रिया करणे आवश्यक आहे. पेरणीपूर्वी धने फोडून बिया वेगळया कराव्यात यासाठी धने चपलेने अथवा लाकडी फळीने रगडून बी वेगळे करावे. तसेच पेरणीपूर्वी धन्याचे बी १२ तास पाण्यात उबदार जागी ठेवावे आणि नंतर लागवडीसाठी वापरावे. त्यामुळे उगवण १५ ते २० दिवसा ऐवजी ८ ते १० दिवसात होवून कोथिंबीरीच्या उत्पादनात वाढ होते आणि काढणी लवकर होण्यास मदत होते.

खते आणि पाणी व्यवस्थापन : कोथिंबीरीच्या पिकाच्या चांगल्या आणि जोमदार वाढीसाठी बी पेरताना हेक्टरी ३५ ते ४० गाडया शेणखत जमिनीत मिसळून द्यावे. कोथिंबीरीच्या पिकाला पेरणीच्या वेळी ५० किलो १५-५-५ हे मिश्रखत द्यावे. बी उगवून आल्यावर २०-२५ दिवसांनी हेक्टरी ४० किलो नत्र द्यावे. कोथिंबीरीचा खोडवा घ्यावयाचा असल्यास कापणीनंतर हेक्टरी ४० किलो नत्र द्यावे. कोथिंबीरीला नियमित पाणी देणे आवश्यक आहे. सुरूवातीच्या काळात बियांची उगवण होण्यापूर्वी वाफयाला पाणी देताना वाफयाच्या कडेने वाळलेले गवत किंवा उसाचे पाचट लावावे.

काढणी उत्पादन आणि विक्री : पेरणीपासून दोन महिन्यांनी कोथिंबीरीला फुले येण्यास सुरुवात होते. म्हणून त्यापूर्वी हिरवीगार आणि कोवळी लुसलुशीत असतानां कोथिंबीरीची काढणी करावी. साधारणपणे १५ ते २० सेमी उंच वाढलेली परंतु फुले येण्यापूर्वी कोथिंबीर उपटून अथवा कापून काढणी करावी. नंतर कोथिंबीरीच्या जुडया बांधून गोणपाटात किंवा बांबूच्या टोपल्यांमध्ये व्यवस्थीत रचून बाजारात विक्रीसाठी पाठवावी. पावसाळी आणि हिवाळी हंगामात कोथिंबीरीचे हेक्टरी १० ते १५ टन उत्पादन मिळते तर उन्हाळी हंगामात ६ ते ८ टन उत्पादन मिळते.

किड व रोग : कोथिंबीरीवर फारसे रोग आणि किडी दिसून येत नाही.काही वेळा मर रोगाचा प्रार्दूभाव होतो. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी लांम सी एस-६ सारख्या भुरी प्रतिबंधक जातीचा वापर करावा. आणि पाण्यात विरघळणारे गंधक वापरावे.




### महत्वाच्या घटना

१९३५ : सन म्युंग मूनला येशू ख्रिस्ताने स्वप्नात साक्षात्कार दिला व आपण सुरु केलेले कार्य पुढे नेण्याची आज्ञा केली.
१९४१ : दुसरे महायुद्ध युगोस्लाव्हियाने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४६ : सिरीयाने फ्रान्सकडून स्वातंत्र्य मिळवले.
१९५० : बॅ. मुकुंदराव जयकर पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू झाले.
१९५२ : पहिली लोकसभा अस्तित्त्वात आली.
१९७० : चांद्रयान अपोलो १३तील अंतराळवीर सुरक्षितपणे पृथ्वीवर परतले.
१९७१ : द पीपल्स रिपब्लिक ऑफ बांग्लादेशची स्थापना झाली.
१९७५ : ख्मेर रुजने कंबोडियाची राजधानी नॉम पेन्ह जिंकली.
१९८० : 'अपोलो-१३' हे अंतराळयान चांद्रमोहीम अर्ध्यावर सोडून सुखरुप पृथ्वीवर परतले.
१९८३ : भारतीय अवकाश संशोधन संस्थेने उपग्रह प्रक्षेपण वाहन(रॉकेट) 'एसएलव्ही३' चे प्रक्षेपण केले.
१९९३ : एसटीएस-५४ हे संशोधक अंतराळयान सुखरूप पृथ्वीवर परतले.
२००१ : अफवांच्या अर्थशास्त्राचा सिद्धांत मांडणारे मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी मधील अर्थशास्त्रज्ञ प्रा. अभिजित बॅनर्जी यांना पहिला 'माल्कम आदिशेषय्या पुरस्कार' जाहीर

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७९ : कवी सूरदास, हिंदीतील एक थोर कवी व श्रेष्ठ कृष्ण भक्त.
१८२० : बेसबॉल चे जनक अलेक्झांडर कार्टराईट यांचा जन्म. (मृत्यू: १२ जुलै १८९२)
१८३७ : जे. पी. मॉर्गन अमेरिकन सावकार (मृत्यू: ३१ मार्च १९१३)
१८९१ : यशवंत रामकृष्ण दाते कोशकार. चिं. ग. कर्वे यांच्या साहाय्याने त्यांनी 'महाराष्ट्र मंडळ कोश' स्थापन करून आठ खंडांचा 'महाराष्ट्र शब्दकोश' तयार केला. (मृत्यू: २१ मार्च १९७३)
१८९७ : निसर्गदत्त महाराज अद्वैत तत्त्वज्ञानी (मृत्यू: ८ सप्टेंबर १९८१)
१९१२ : भारतीय कादंबरीकार आणि मल्याळम साहित्याचे लघुकथा लेखक थकाझी शिवसंकरा पिल्लई यांचा जन्मदिन.
१९१६ : सिरीमाओ बंदरनायके श्रीलंकेच्या ६ व्या व जगातील पहिल्या महिला पंतप्रधान. त्यांचे पती श्रीलंकेचे व दुसरे पंतप्रधान सॉलोमन बंदरनायके यांच्या हत्येनंतर त्या पंतप्रधान झाल्या. त्यांनीच देशाचे 'सिलोन' हे नाव बदलून 'श्रीलंका' केले. खाजगी शाळा, तेलमंपन्या रबराचे मळे व चहाचे मळे यांचे त्यांनी राष्ट्रीयीकरण केले. (मृत्यू: १० आक्टोबर २०००)
१९४३ : भारतीय इतिहासकार व प्राध्यापक डॉ. एन. एन. नामपोथीरी यांचा जन्मदिन.
१९५१ : बिंदू चित्रपट अभिनेत्री
१९६१ : गीत सेठी बिलीयर्डसपटू
१९७२ : मुथैय्या मुरलीधरन श्रीलंकेचा क्रिकेटपटू
१९७७ : दिनेश मोंगिया क्रिकेटपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९० : बेंजामिन फ्रँकलिन, विजेच्या शक्तीविषयी महत्त्वाचा शोध लावणारे अमेरिकेतील थोर शास्त्रज्ञ.
१८८२ : फ्लश टॉयलेट चे शोधक जॉर्ज जेनिंग्स यांचे निधन. (जन्म: १० नोव्हेंबर १८१०)
१९४६ : व्ही. एस. श्रीनिवासशास्त्री कायदेतज्ञ, सूक्ष्मबुद्धीचे राजकारणी, भारत सेवक समाजाचे अध्यक्ष आणि इंग्रजी वक्ते (जन्म: २२ सप्टेंबर १८६९)
१९७५ : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन भारताचे दुसरे राष्ट्रपती, पहिले उपराष्ट्रपती आणि तत्त्वज्ञ, त्यांच्या गौरवार्थ त्यांचा जन्मदिन हा भारतात 'शिक्षक दिन' म्हणून ओळखला जातो. (जन्म: ५ सप्टेंबर १८८८)
१९९७ : बिजू पटनायक ओरिसाचे मुख्यमंत्री, केन्द्रीय पोलाद, खाणकाम आणि कोळसा मंत्री (जन्म: ५ मार्च १९१६)
१९९८ : चित्रपट निर्माते विजय सिप्पी (वय ५५) यांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू (जन्म:)
२००१ : डॉ. वामन दत्तात्रय तथा 'वा. द.' वर्तक वनस्पतीशास्त्रज्ञ व देवराई अभ्यासक (जन्म: १९ आक्टोबर १९२५)
२००४ : सौंदर्या कन्नड, तामिळ, तेलगू, मल्याळम आणि हिन्दी चित्रपट अभिनेत्री (जन्म: १८ जुलै १९७२)
२००५ : भारतीय राज्य उत्तरप्रदेश आणि हिमाचल प्रदेशाचे माजी राज्यपाल विष्णू शास्त्री यांचे निधन.
२०११ : विनायक आदिनाथ तथा 'वि. आ.' बुवा विनोदी साहित्यिक (जन्म: ४ जुलै १९२६)
२०१२ : वसंत दिवाणजी, कन्नड साहित्यात मौल्यवान योगदान देणारे प्रतिभावंत लेखक.

# पोलीस व्हेरिफिकेशनमध्ये तुमच्या प्रतिमेला दाग लागू देऊ नका

## समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे प्रतिपादन

शिरूर । प्रतिनिधी

तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. यासाठी लागणारे पोलीस व्हेरिफिकेशन अति महत्त्वाचे समजले जाते. या पोलीस व्हेरिफिकेशनमध्ये तरुणांनी आपल्या प्रतिमेला दाग लागू देता कामा नये. यासाठी तरुणाने सावधान राहिले पाहिजे असा लाखमोलाचा सल्ला देत समाजप्रबोधकार हभप.निवृत्ती महाराज देशमुख यांनी तरुणांनो सावधान...पोलीस व्हेरिफिकेशनमध्ये तुमच्या प्रतिमेला दाग लागू देऊ नका असे राक्षसभुवन च्या सप्ताहामध्ये कळकळीचे विधान करून तरुणांना जागृत केले आहे.

धाकटी पंढरी श्रीक्षेत्र नारायणगडाचा ७३ वा नारळी सप्ताह शिरूर कासार तालुक्यातील राक्षसभुवन (तांबा)येथे महंत शिवाजी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व उत्तराधिकारी संभाजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली गेल्या सहा दिवसापासून वैभवशाली थाटामध्ये पार पडत आहे. या सप्ताहातील सहाव्या दिवसाची कीर्तनसेवा समाज प्रबोधनकार हभप. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रस्तुत कीर्तनाच्या माध्यमातून महाराजांनी उपस्थित तरुणांना जागृत करण्यासाठी कळकळीचा संदेश दिला आहे. शेतकऱ्यांची तरुण मुले दिशाहीन होत चालली आहे. त्यांना आजची समाज व्यवस्था दिशा दाखवण्याऐवजी त्यांचा वापर करून त्यांचे जीवन उध्वस्त करू पाहत आहे. राजकारणी लोक वेगवेगळे मुद्दे पुढे काढून समाजात चालू असलेली शांतता भंग करत आहे. आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी तरुणांची डोके भडकवत आहेत. अनेक ठिकाणी दंगली होतात या दंगलीमध्ये गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांचा वापर होतो. दंगलीमध्ये अटक झालेली बहुतांश मुले ही शेतकऱ्यांची आणि गोरगरिबाचे असतात. दंगल करण्यासाठी श्रीमंताची मुले कधी बाहेर पडत नाहीत. आई-वडिलांनी आपल्या पोटाला पीळ देऊन विद्यार्थ्यांचे शिक्षण केलेले असते. मुलगा ज्या ज्या वेळी नोकरीसाठी भटकंती करतो, त्यावेळी त्याला पोलीस व्हेरिफिकेशन ( कॅरेक्टर सर्टिफिकेट ) महत्वपूर्ण असते. या पोलीस व्हेरिफिकेशनमध्ये विद्यार्थ्यांची प्रतिमा डागाळलेली असली तर हुशार असूनही त्याला नोकरी मिळत नाही. यासाठी तरुणांनी सावध व्हायला पाहिजे. कुठल्याही राजकीय दंगलीमध्ये सहभागी न होता आपल्या चारित्र्याला दाग लागणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. असे समाज प्रबोधनकार हभप.निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांनी राक्षसभुवन येथील सप्ताहाच्या माध्यमातून तरुणांना जागृत केले आहे. यावेळी हभप महंत शिवाजी महाराज, उत्तराधिकारी संभाजी महाराज, महंत नारायण ढिसले, बळीराम महाराज औटे, मृदंगाचार्य केशव महाराज जगदाळे राजाभाऊ महाराज गवते, लक्ष्मण महाराज तकीक, रामनाथ महाराज सालपे, कुमार महाराज ठोसर, शरद महाराज डोळस, निवेदक ज्ञानदेव काशीद आदींसह हजारोंच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.





### भाविकांना भाजी भाकरीचा आस्वाद

श्री.क्षेत्र नारायणगडाच्या ७३ वा नारळी सप्ताह दिवसेंदिवस भाविकांच्या उपस्थितीमुळे मोठे व्यापक स्वरूप घेत असून तर दिवस रात्रीच्या वेळी कीर्तनासाठी हजारोच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होतात आणि या ठिकाणी चालू असलेल्या अखंड अन्नछत्रांमध्ये भाजी भाकरीच्या भोजनाचा आस्वाद घेऊन तृप्तीचा ढेकर देत आहेत. गावकरी करतात उत्कृष्ट सेवादान राक्षस भवन येथील सप्ताहाचा नावलौकिक भाविकाच्या माध्यमातून सर्व दूर जावा यासाठी राक्षसभुवनचे ग्रामस्थ रात्रंदिवस मोठी मेहनत घेऊन सप्ताहासाठी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी उत्कृष्ट सेवा दान करत आहेत. भाविक भक्तांना सुख सुविधा देत आहेत.

# बीएसएनएलला येणार स्पीड

## खा.सोनवणेकडून युध्दपातळीवर काम करण्याच्या सूचना

बीड । प्रतिनिधी

बीड व आहल्यिानगर जल्हि्यातील बीएसएनएलच्या सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आहल्यिानगर येथे झालेल्या जल्हिा दूरसंचार समितीच्या बैठकीत समितीचे अध्यक्ष खा.बजरंग सोनवणे यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत फटकारले. 'युद्धपातळीवर काम करा, नाहीतर जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होईल,' असा इशारा दिला. यामुळे आता बीएसएनएलच्या कामांना स्पिड येणार आहे.

अहल्यिानगर येथील बैठकीस आहल्यिानगर लोकसभा मतदारसंघाचे खा.निलेश लंके, बीएसएनएलचे महाप्रबंधक राजेंद्रसिंग चोंगड, बीडचे सहमहाप्रबंधक बी.एस.अनारे, नगर विभागाचे वाघ, तसेच राजू थोरात, दीपक जोशी, व्ही.बी.जोशी, अनंत्रे, दिनेश मालू, विजय पिंपरकर, योगेश सुले आदी अधिकारी उपस्थित होते.खा.बजरंग सोनवणे यांनी यापूर्वी ४६१ गावांना बीएसएनल नेटवर्क येत नसल्यामुळे



अशा गावांची यादी करुन तिथे ४ जी टॉवर उभे करण्याच्या कामास मंजुरी मिळविली होती. यातील अद्याप सेवावंचित असलेल्या गावांमध्ये तातडीने ४जी टॉवर्स उभे करून सेवा सुरू करण्याचे आदेश त्यांनी दिले. जल्हि्यातील सर्वच गावांना ऑप्टिकल फायबर नेटवर्कद्वारे जोडण्यावरही भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. डिजिटल भारत निधी योजनेअंतर्गत सर्व शासकीय कार्यालये, शासकीय अनुदानित संस्था, बँका इत्यादींना बीएसएनएल ४ जी व ब्रॉडबँड सेवा देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. विशेषत: ज्या गावांत ४ जी सेवा आधीपासून आहे, त्या ठिकाणी सुविधा अपग्रेड करून ५ जी सेवा देण्यासाठी नियोजन सुरू आहे.बैठकीत जलजीवन योजनेतील पाईपलाईनच्या खोदकामामुळे बीएसएनएलच्या केबल लाईन्सच्या झालेल्या नुकसानीबाबत चर्चा झाली. संबंधित अधिकाऱ्यांनी ही बाब निदर्शनास आणून दिली. यावर खा.सोनवणे यांनी पंचनामे करून नुकसान भरपाईचे प्रस्ताव जल मंत्रालयाला तत्काळ पाठवण्यिाचे आदेश दिले.

# खोडवा जाळताना बांधावरील झाडे होरपळून जाताहेत

## वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे संत तुकारामांच्या अभंगाचा विसर पडलाय

लिंबागणेश । प्रतिनिधी

दरवर्षी रब्बी हंगामातील ज्वारीचे, गव्हाचे पिक निघाल्यानंतर शेतीची मशागत सुरू होते.यादरम्यान शेतकरी आपल्या शेतात खत टाकणे,नांगरणी करणे आदी कामे करतात.यादरम्यान ज्वारी ,गव्हाचा खोडवा नष्ट करण्यासाठी शेताच्या कडेला असलेल्या ताली पेटवुन देतात. रस्त्यालगत असणाऱ्या शेतजमीन मालकांकडून लावलेल्या आगीत झाडे होरपळून निघतात.झाडांची मोठी हानी होते. ''झाडे लावा,झाडे जगवा''पाणी अडवा पाणी जिरवा '' अशा आपण दिलेल्या घोषणा हवेतच विरतात.त्याची अंमलबजावणी किती प्रमाणात होते याचा विचार केला जात नाही.ग्रामीण भागातील शेतकरी पिकांना वसवा नको म्हणून



बांधावरील झाडे तोडतात. उष्णतेचा दाह वाढल्याने हवामान आणि पृथ्वीच्या तापमानावर दुष्परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी खोडवा जाळताना बांधावरील झाडांना ईजा होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबा गणेश कर यांनी केले आहे. वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे या वृक्षसंपदेचे, वनसंपदेचे महत्व पटवुन देणा-या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा आपल्याला विसर पडला असुन तो अंगिकारला तरच पुढील पिढ्या सुखाने आनंदाने जगतील. माणसाला सुसह्यपणे जगण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडांची लागवड करणे गरजेचे आहे.पुर्वी रस्त्याच्या बाजूला वडाची,पिंपळाची,लिंबाची मोठमोठाली झाडं असायची. त्यामुळे रस्त्याने जाताना थंडावा जाणवायचा . मात्र आता रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली अनेक मोठमोठाल्या वृक्षांची कत्तल करण्यात आली आहे. तोडण्यात आलेली झाडे पुन्हा लावण्यात येत नाहीत.

# स्वामी समर्थ सेवा केंद्रात अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात दि २० ते २६ एप्रिल दरम्यान अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.



या सप्ताहात सात दिवसीय श्री गुरुचरित्र पारायण, अखंड प्रहरे, श्री गणेश याग, मनोबोध याग, चंडी याग, स्वामी याग, गीताई याग, रुद्र मल्हारी याग तसेच श्री नवनाथ भक्तिसार, सुलभ भागवत, श्रीपाद श्रीवल्लभ चरित्र, दररोज दुपारच्या वेळी सामुहिक श्री स्वामीचरित्र सारामृत, श्री दुर्गा सप्तशती, रुद्र पठण, श्री स्वामी समर्थ अखंड नामस्मरण, सांस्कृतिक कार्यक्रम, दररोज सायंकाळी सहा वाजता औदुंबर प्रदक्षिणा, दि. २६ रोजी श्री सत्यदत्त पूजन, बलिपुर्णाहुती सकाळी ठिक साडे दहा वाजता महानैवेद्य आरतीने सप्ताहाची सांगता येणार आहे. या सप्ताहाच्या कालावधीत प्रश्नोत्तरे, ग्रामाभियान प्रशिक्षण, संपन्न होणार असून श्री गुरुचरित्र पारायण सेवेसाठी तसेच सप्ताहाच्या कालावधीत होणाऱ्या सर्व अध्यात्मिक सेवेत माजलगाव शहरासह तालुक्यातील सर्व साप्ताहिक व दैनिक केंद्रातील सेवेकरी, भाविक भक्त, नागरिक यांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी माजलगाव च्या वतीने करण्यात आले आहे.

# आधार व्यसनमुक्ती केंद्रामधे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

बीड । प्रतिनिधी

दि.१४ एप्रील २०२५ रोजी आधार व्यसनमुक्ती केंद्रामधे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी केंद्र संचालक तेजसनाना घुमरे, प्राचार्य डी.जी.तांदळे सर(मार्गदर्शक महाराष्ट्र राज्य शिक्षक संघटना) डॉ.संजयजी तांदळे(सामाजिक कार्यकर्ते), मा.नितीनजी जायभाये( निमंत्रक बीड बचाव मंच ) व मा.बाजीरावजी ढाकणे ( लेक लाडकी अभियान ) यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमास सुरवात झाली व नंतर मान्यवरांचे मार्गदर्शन झाले. यावेळी प्राचार्य डी.जी.तांदळे सरांनी डॉ.बाबासाहेबांच्या कार्य विषद करताना शिक्षण, शेती, अर्थ, समाजसुधारणा, कायदे व व्यसनाधिनता या क्षेत्रातील बाबासाहेबांचे उल्लेखनिय कार्य सांगीतले. तसेच उपस्थितांना अध्यात्म व



व्यसनाधिनता याची सांगड घालुन व्यसनापासुन दुर राहा असा संदेश दिला. डॉ.संजय तांदळे यांनी व्यसनाधिनतेमधे योगा व ध्यानधारणेचे महत्व पटवुन देऊन मोफत योग शिबीर घेण्याचे अश्वासन दिले.नितीन जायभायेसरांनी डॉ. बाबासाहेबांचे कार्य सांगतानाच युवकांनी शिक्षण व व्यवसायाकडे लक्ष केंद्रीत करून कुटुंबाला सक्षम करावे असा संदेश दिला. यावेळी अध्यक्षीय भाषणात तेजसनाना यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व सुधारणा सांगताना समता व बंधुभाव जपुन स्वाभिमानी जीवन जगण्याचा निर्धार रूग्णांनी करावा व व्यसनमुक्त तथा आनंदी जीवन जगावे हा संदेश दिला. या कार्यक्रमास तेजसनाना घुमरे, प्राचार्य डी.जी.तांदळे सर, डॉ.संजय तांदळे,नितीन जायभाये सर, मा.बाजीराव ढाकणे, केंद्र अधिक्षक संजय भडगळे, केंद्र समुपदेशक गणेश जाधव, केंद्रातील रूग्ण आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक गणेश जाधव सुत्रसंचालन बाजीराव ढाकणे यांनी तर आभार प्रदर्शन संजयजी भडगळे यांनी केले.

# देवखेडा येथील गोशाळेत चारा वाटप

## जय गजानन महिला ग्रुपचा स्तुत्य उपक्रम



बीड । प्रतिनिधी

दि.१६.शहराजवळ असणाऱ्या देवखेडा येथील गोशाळेत जय गजानन महिला ग्रुपच्यावतीने दि.१५ रोजी चाऱ्यासह खुर्च्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

माजलगाव येथील जय गजानन महिला ग्रुपच्या वतीने दरवर्षी सामाजिक उपक्रम घेतले जातात. यासाठी लागणारा खर्च इतर कोणालाही न मागता सर्व महिला मिळून करतात. प्रत्येक दिवाळीला वृद्धाश्रम, अनाथालय तसेच वंचित गरीब कुटुंबातील सर्वांची दिवाळी गोड करण्याचे काम या ग्रुपच्यावतीने मागील काही वर्षापासून सुरू आहे. आता उन्हाळ्याचे दिवस असल्याने सर्वत्र चाऱ्याची टंचाई आहेत. त्यामुळे जनावरांना चारा मिळणे कठीण झाले आहे.

बाब ओळखून जय गजानन महिला ग्रुपच्यावतीने देवखेडा येथील गोशाळेला चारा व तेथील कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी खुर्च्या वाटप करण्यात आल्या. महिलांनी मिळून केलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बदलत्या जीवनशैलीमुळे किशोरवयीन मुलींमध्ये पीसीओएस विकार वेगाने वाढतोय- डॉ. पूजा माने

बीड । प्रतिनिधी

जागतिक आरोग्य दिनानिमित्त बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत पीसीओएस आणि पीसीओडीच्या पॅथोफिजियोलॉजी या विषयावर निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य या संदर्भात डॉ. पूजा माने-जाधव, (एमबीबीएस, डीजीओ) यांचे अतिथी व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी बदलत्या जीवनशैलीमुळे किशोरवयीन मुलींमध्ये पीसीओएस विकार वेगाने वाढत असल्याचे कारण सांगितले. यावेळी आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला आदित्य शिक्षण संस्थेतील आयुर्वेद, नर्सिंग, दंत, कृषी, कृषी अभियांत्रिकी अन्न तंत्र जैवतंत्र, फार्मसी फिजिओथेरपी महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उदघाटकन आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. दर्जेदार शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचीही काळजी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा हे सातत्याने घेत आहेत. शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रात आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी नेहमीच टॉपवर आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना आरोग्य विषयी सखोल माहिती मिळावी यासाठी - डॉ. पूजा माने यांचे व्याख्याने ठेवले होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. पुजा माने म्हणाल्या की, आजच्या धावपळीच्या आणि बदलत्या जीवन शैलीच्या युगात किशोरवयीन मुलींमध्ये पीसीओएस (पॉलिसिस्टिक ओव्हेरियन सिंड्रोम) हा विकार वेगाने वाढताना दिसत आहे. हार्मोनल असंतुलनामुळे निर्माण होणाऱ्या या समस्येमुळे मासिक पाळीच्या तक्रारी, वजनवाढ, केस गळणे, चेहऱ्यावर केस येणे तसेच भविष्यात गर्भधारणेतील अडचणी अशा अनेक त्रासदायक लक्षणांचा सामना मुलींना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर किशोरवयीन मुलींमध्ये विषयी योग्य माहिती, त्याची कारणे, लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, आहार आणि जीवनशैलीत बदल याविषयी जागरूकता निर्माण करणे हे या व्याख्यानाचे प्रमुख उद्दिष्ट होते. आजाराचे निदान लवकर झाल्यावर योग्य सवयींमुळे या समस्येवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. असे स्त्रीरोग तज्ज्ञ पुजा माने-जाधव म्हाणाल्या. यावेळी आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. मयुरी शिंदे, डॉ. मीरा नागरे, डॉ. विनोद राहिंज, डॉ. प्रगती राख, डॉ. मोहिते, डॉ मार्कंड, रामेश्वर ढोबळे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रा.डॉ. मयुरी शिंदे यांनी विद्यार्थ्यांना जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य कसे सुधारावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी सानिया बनेवाले, स्वरांजली मस्के व लक्ष्मी कोटगीरवार यांनी केले. आभार डॉ. मीरा नागरे यांनी मानले.



आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी विविध क्षेत्रात टॉपवर आहेत. दर्जेदार शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना आरोग्याचे धडे मिळाले आणि त्यांनी ते आत्मसात केले तर त्यांचे जिवन सुखकर होते. यासाठी आदित्य शिक्षण संस्थेत शिक्षण, क्रीडा आणि आरोग्य या विषयावर नेहमीच विविध तज्ज्ञांचे व्याख्यान, मार्गदर्शन ठेवले जाते. त्यामुळे आमचे विद्यार्थी आज सर्वत्र टॉपवर आहेत.

- डॉ. आदिती सारडा, संचालिका आदित्य शिक्षण संस्था, बीड

# राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शनिवारी परळीत बैठक

परळी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने परळी विधानसभा मतदारसंघाचा आढावा, पक्षाच्या विविध आघाडीवरील पदाधिकाऱ्यांच्या निवडी तथा कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याच्या अनुषंगाने शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात ही बैठक सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे. या बैठकीस बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह मान्यवर नेतेमंडळींची उपस्थिती असणार आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पक्षावर निष्ठा ठेवणाऱ्या सर्वांची महत्त्वपूर्ण बैठक शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या उपस्थितीत सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात ही बैठक संपन्न होणार आहे. या बैठकीत मतदारसंघातील विविध महत्त्वपूर्ण मुद्यांवर चर्चा केली जाणार असून, पक्षाच्या नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यासाठी पक्षाचे सर्व मार्गदर्शक नेतेमंडळी आढावा घेणार आहेत. या बैठकीस परळी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्यासह उत्तम दादा माने, मिनिनाथ दादा फड, देवराव महाराज लुगडे, बाबासाहेब शिंदे, जीवनराव देशमुख, एच.यू.फड, शंकर शेजुळ, वर्षाताई रायभोळे, कल्पनाताई देशमुख, रमेश ढाकणे, सोमनाथ भोसले, फिरोज सय्यद, कल्पनाताई देशमुख, मंगलताई सोळंके, अश्विनीताई सोळंके, दीपाली सावंत, अश्विनी सरवदे, हनुमंत फड, डॉ.जे.एन.शेख, गणेश देवकते, भीमराव हाके, प्रकाश राठोड, राजेश फड, शिवाजीराव नागरगोजे, शिवाजीराव लोमटे, भगवानराजे कदम, एकनाथ मुंडे, गोपाळराव सलगर, प्रकाश मुंडे, पप्पू गित्ते, समाधान मुंडे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे.

# अंबाजोगाई महाराष्ट्रातले तिसरे पुस्तकांचे गाव जाहीर

## उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांची घोषणा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

समस्त अंबाजोगाईकरांची बऱ्याच दिवसांपासून अपेक्षा होती की, अंबाजोगाई शहर हे पुस्तकांचे गाव जाहीर करावे. याकरिता माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी महाराष्ट्र सरकारकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. मोदी यांनी वैयक्तिकरित्या कॅबिनेट मंत्री ना.उदय सामंत व माजी मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली होती. मोदी यांच्या पाठपुराव्याला अखेर यश प्राप्त झाले असून बुधवारी बीड शहरात उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत हे आले असता त्यांनी अंबाजोगाई शहर तिसरे पुस्तकांचे गांव होणार, आद्यकवी मुकुंदराज यांच्या नांवाने राज्यस्तरीय पुरस्कार देणार आणि माता श्री योगेश्वरी देवी, आद्यकवी मुकुंदराज व सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर विकासासाठी पुढाकार घेणार असे जाहीर केले. यावेळी माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्यासह आद्यकवी मुकुंदराज ट्रस्टचे अध्यक्ष ह भ प किसन महाराज पवार, बीडच्या प्राचार्या डॉ दिपाताई क्षीरसागर, जेष्ठ साहित्यीक सतीश साळुंके, कवी साळगावकर, अतुल कुलकर्णी, संजय देवळनकर, शिवसेनेचे सचिन मुळुक, अनिल जगताप हे उपस्थित होते.

याबाबत अधिक माहिती देताना माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, मुकुंदराज संस्थानचे किसन महाराज पवार यांनी सांगितले की, अंबाजोगाई शहर हे आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्य, नाट्य, क्रीडा, सहकार, ग्रंथ, परिवर्तनवादी चळवळीचे केंद्र आहे.येथे मराठीचे आद्यकवी मुकुंदराज यांची समाधीस्थळ आहे. ग्रामदेवता माता श्री योगेश्वरी चे मंदिर आहे. त्यामुळे अंबाजोगाई शहर हे पर्यटनदृष्ट्या सक्षम असून लेखक, साहित्यिक व वाचन प्रेमी वर्ग या शहरात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. वाचन संस्कृतीला बळ देणारे असे विविध उपक्रम वर्षभर अंबाजोगाईमध्ये राबविले जातात. अंबाजोगाई ही मराठी भाषेचे आद्य कवी मुकुंदराज, प्रकांड पंडित सर्वज्ञ दासोपंत यांची कर्मभूमी आहे. तसेच कोकणस्थांची कुलदेवता माता योगेश्वरी देवी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेलं गाव आहे. नैसर्गिक विविधतेने नटलेले



गांव आहे. नदी, डोंगर, वनराई, पशु पक्षी यासोबतच मंदिराचे गांव म्हणून अंबाजोगाईची ओळख आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याचे नेतृत्व ज्यांनी

### आद्यकवी मुकुंदराज यांच्या नांवाने राज्यस्तरीय पुरस्कार देणार; माता श्री योगेश्वरी देवी, आद्यकवी मुकुंदराज व सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर विकासासाठी पुढाकार घेणार

### राजकिशोर मोदी यांच्या पाठपुराव्याला यश

### अंबाजोगाईकरांच्या वतीने केली होती निवेदनाद्वारे मागणी

केले ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या लोककार्याची साक्ष देणारे हे गांव आहे. दिवंगत नेते प्रमोदजी महाजन, दिवंगत नेते गोपीनाथराव मुंडे, माजी खासदार बापूसाहेब काळदाते, माजी आमदार बाबुरावजी आडसकर, डॉ.द्वारकादास लोहिया, भगवानराव लोमटे बापू, डॉ.व्यंकटराव डावळे, रामकाका मुकादम यांच्यासह अनेक मान्यवरांनी विविध क्षेत्रात अंबाजोगाईचा लौकिक सर्वदूर केला आहे. ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ तिवारी, अमर हबीब, स्व.शैलाताई लोहिया, डॉ.नागरगोजे, दिनकर जोशी, दगडू लोमटे, बालाजी सुतार, मुकूंद राजपंखे, प्राचार्य डॉ कमलाकर कांबळे, प्रा.गौतम गायकवाड, बलभीम तरकसे, विश्वांभर वराट गुरूजी, स्व.प्रा.संभाजी सावळकर यांनी अंबाजोगाई साहित्य संमेलन चळवळीला बळ दिले आहे.

अंबाजोगाई शहरात बालझुंब्बड सारखा उपक्रम मागील अनेक वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. बालझुंब्बड मुळे नव्या पिढीला एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. बालझुंब्बड ने हजारो विद्यार्थी घडविले आहेत. हे विशेष होय. अशा वैविध्यपूर्ण बाबींमुळे अंबाजोगाई शहर तिसरे पुस्तकांचे गाव समस्त अंबाजोगाईकरांच्या मागणीला मिळालेलं हे सर्वात मोठं यश असून ही आपल्या सर्वांसाठीच आनंदाची बाब आहे. अंबाजोगाई शहर तिसरे पुस्तकांचे गांव होणार, आद्यकवी मुकुंदराज यांच्या नांवाने राज्यस्तरीय पुरस्कार देणार ◀◀ पान ३ वर

# सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठी साहित्यिकांचे बीडमध्ये मराठी भाषा संवर्धन मंत्र्यांना साकडे

## साहित्यिक डॉ.दिपाताई क्षीरसागर यांचे ना.उदय सामंत यांना निवेदन



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि त्याचे जतन व विकास करण्यासाठी बीडच्या साहित्यिक डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी उद्योग व मराठी भाषा संवर्धन मंत्री उदय सामंत यांना निवेदन सादर केले. या निवेदनात बीड शहराच्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि साहित्यिक परंपरेला चालना देणाऱ्या अनेक योजनांचा समावेश आहे.

डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी बीड येथे उद्योग व मराठी भाषा संवर्धन मंत्री उदय सामंत यांना दिलेल्या निवेदनात जिल्ह्यातील सांस्कृतिक, शैक्षणिक विकासासाठी विविध मागण्या मांडल्या आहेत. निवेदनात पुढे म्हटले आहे की, बीडमधील पाटंगण घराण्याकडे असलेल्या दुर्मिळ पोथ्यांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन करून त्या सुरक्षित ◀◀ पान ३ वर



बीड -मंत्री उदय सामंत, संभाजीनगरचे खा. संदीपान भुमरे हे जिल्हा दौऱ्यावर आले असता शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या सह्याद्री निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचे जेष्ठ नेते अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी स्वागत केले.

# डॉ.आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम

## न्यू सिद्धार्थ ग्रुप नवा मोंढा आणि हमाल मापाडी युनियन यांची बांधिलकी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील न्यू सिद्धार्थ ग्रुप, नवा मोंढा, मुकुंदराज कॉलनी आणि हमाल मापाडी युनियन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी ही भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जोपासत विविध उपक्रम राबविण्यात आले. अन्नदान करून तसेच विविध उपक्रम राबवून महामानवांना मानवंदना देण्यात आली.

याबाबत न्यू सिद्धार्थ ग्रुप, नवा मोंढा येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे तसेच हमाल



मापाडी युनियन, अंबाजोगाईचे अध्यक्ष बालासाहेब आदमाने यांनी सांगितले की, अंबाजोगाई शहरात सोमवार, दिनांक १४ एप्रिल रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी अशोक चक्रांकित निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण बालासाहेब आदमाने यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर अभिवादन विचारमंचाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य शेळी-मेंढी पालन महामंडळाचे माजी अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) बालासाहेब दोडतले, अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड.राजेश्वर चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. आकर्षक मिरवणूक रथाचे उद्घाटन भिमसेन आप्पा लोमटे यांनी केले. तर ॲड.संजयभाऊ साळवे, धनराज गित्ते नंदागौळकर व राजेभाऊ साळवे यांनी अल्पोपहार म्हणून खिचडी वाटप उपक्रमाचे उद्घाटन केले.

# मानवलोकच्या पुढाकारातून निराधारांना जीवनावश्यक वस्तुंचे वितरण

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी राबविला उपक्रम

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या मानवलोक सेवाभावी संस्था,जन सहयोगच्या वतीने तळागाळात जीवन जगणारे सामान्य लोक, वृद्ध निराधार यांना जीवनावश्यक वस्तुंचे वितरण कार्यक्रम विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी संपन्न झाला.

यावेळी जेष्ठ नागरिक संघटनेचे पदाधिकारी धनराज मोरे, मानवलोकचे अण्णा साहेब रोहम अरूण आसरडोहकर,पत्रकार राहूल



देशपांडे, सामाजिक कार्यकर्ते शाम सरवदे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.धनराज मोरे म्हणाले की ज्यांना समस्या नाहीत ते सुखी आहेत पण ज्यांच्या समस्या आहेत त्यांच्या समस्यांची उकल व्हावी यासाठी डॉ.लोहिया यांनी उपक्रम राबविले आहेत. कुणाकडून तरी कुणासाठी संधी असते यावर आधारित बोधकथा सांगितली.

मानवलोक संस्था सामाजिक कार्यासाठी ओळखली जाते डॉ. व्दारकादास (बाबूजी) लोहिया यांनी जी पायवाट घालून दिली त्याच पाय वाटेने मानवलोक परिवार जात आहे .निराधारांच्या मदतीसाठी अनेक हात पुढे येतात त्यांचे कौतुक केले पाहीजे मानवलोक संस्था निराधार, दीन, दुबळे,पिडित यांच्यासाठी आधार असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी उपस्थितांच्या हस्ते जवळपास शंभर निराधार,वृद्ध,महिला यांना जीवनावश्यक वस्तुंचे वितरण करण्यात आले. सुरुवातीला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ◀◀ पान ३ वर

# जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ चा शुभारंभ

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर यांच्या पुढाकाराने आयोजित जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा - २०२५ यांनी आयोजित केलेल्या आंबेजोगाई येथील तालुकास्तरावर तहसील कार्यालय अंबाजोगाई येथे १५ एप्रिल रोजी येथील उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांच्या हस्ते जल कलशाचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला.



१५ एप्रिल ते ३० एप्रिल पर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये दररोज विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे ,अशी माहिती अंबाजोगाई तालुका पाटबंधारे विभागाचे नोडल अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अनिल लोंढे यांनी यावेळी दिली. जलव्यवस्थापन हा अतिशय महत्त्वाचा विषय असून जल पुनर्भरणाबाबत जनजागृती व्हावी असे ◀◀ पान ३ वर

# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात दि २० ते २६ एप्रिल दरम्यान अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.**

या सप्ताहात सात दिवसीय श्री गुरुचरित्र पारायण, अखंड प्रहरे, श्री गणेश याग, मनोबोध याग, चंडी याग, स्वामी याग, गीताई याग, रुद्र मल्हारी याग तसेच श्री नवनाथ भक्तिसार, सुलभ



भागवत, श्रीपाद श्रीवल्लभ चरित्र, दररोज दुपारच्या वेळी सामुहिक श्री स्वामीचरित्र सारामृत, श्री दुर्गा सप्तशती, रुद्र पठण, श्री स्वामी समर्थ अखंड नामस्मरण, सांस्कृतिक कार्यक्रम, दररोज सायंकाळी सहा वाजता औदुंबर प्रदक्षिणा, दि. २६ रोजी श्री सत्यदत्त ◀◀ पान ३ वर

# चाकरवाडी शिवपुराण कथाच्या माजलगाव समितीच्या अध्यक्षपदी सुरेंद्र रेदासनी

माजलगाव । प्रतिनिधी

श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर महाराज यांच्या (२५ व्या ) पुण्यस्मरण रौप्य वर्षा निमित्ताने श्री.चाकरवाडी देवस्थान येथे आंतरराष्ट्रीय किर्तीचे कथा प्रवक्ते परमपूज्य पं.श्री.प्रदीपजी मिश्रा महाराजांच्या सात दिवशीय शिवकथाचे आयोजन करण्यात आले आहे.या शिव कथा श्रवण करण्यासाठी भारतातून तथा महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील शिवभक्त मंडळी येत



असतात. लाखो भक्तांना दहा दिवस अन्न दानाचा जवळपास २० ते २५ कोटी रुपयांचा खर्च येणार असुन या खर्चा पोटी एक दिवस माजलगावकरांना एक दिवसाचा अन्न दान लाभ मिळणार आहे. आणि एक दिवसाच्या तीन वेळेचे अन्नदान मिळुन जवळपास ५ लाख भक्त जेवणाचा लाभ घेणार आहेत.यासाठी अंदाजे एक दिवसाचा खर्च एक कोटी रुपये येणार ◀◀ पान ३ वर

# यात्रेला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे -नगराध्यक्ष राजु जाधव

**पाटोदा । प्रतिनिधी**



पाटोदा शहरात आज भव्य संदल मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही मिरवणूक आज दिनांक १६/०४/२०२५ रोजी रात्री ठीक ९:०० वाजता काळा हनुमान मंदिर,येथून सुरू होणार असून, रस्तागल्ली, माळेगल्ली मार्गे पुढे जाऊन यात्रेच्या ठिकाणी समारोप होणार आहे.ह्या मिरवणुकीत जे मंडळ विशेष आकर्षण ठरणार असून, ते बैलगाडीत देखावा सादर करणार आहेत त्याना पाटोदा नगरपंचायत यांच्या वतीने मंडळास २५०० रुपयांचे रोख बक्षीस देण्यात येणार आहे आशे आवाहन नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, तसेच पाटोदा नगरपंचायतचे सभापती सर्व नगरसेवक यांनी आवाहन केले आसुन आज होणाऱ्या,''पठाण साहेब,हसन साहेब यात्रेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

# अंगातली ताकद व संपत्तीचा वापर योग्य पद्धतीने करा- निवृत्ती महाराज इंदुरीकर



**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

संत वामनभाऊ,भगवानबाबा यांची समाज प्रबोधनपर शिकवण व छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श सर्वांनी तसेच नव तरुणांनी डोळ्यासमोर ठेवून आचरणात आणावा तसेच तरुणांनी व्यसनापासून दूर राहून आई-वडील व संत- महात्म्यांची सेवा करावी. कलीयुगात माणूस संतांच्या विचाराशिवाय सुखी होत नाही असा उपदेश समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी किर्तनातून केला.शिरूर तालुक्यातील पांगरी (मारुतीची) येथील सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व लक्ष्मण शक्ती तसेच यात्रा उत्सव निमित्त मंगळवार (दि.१५) रोजी ह.भ.प.निवृत्ती महाराज यांचे किर्तन आयोजित केले होते.तसेच त्यांनी किर्तनातून संत वामनभाऊ,भगवानबाबा यांना सामान्य झोपडीत राहणारा माणूस सुद्धा देव मानत होते.त्यामुळे त्यांची अनेक ठिकाणी मोठ-मोठे अखंड हरिनाम सप्ताह साजरे केले जात आहेत.प्रत्येकानी आई-वडील व संतांची सेवा करावी त्यामध्येच देवाची सेवा केल्यासारखे ◀◀ पान ३ वर

# पाटोदा नगरपंचायतीने वडिलांच्या नावावरील जागेवर संमतीपत्र घेऊन मुलांना घरकुल मंजूर करावेत-शेवाळे

पाटोदा । प्रतिनिधी

पंतप्रधान आवास (घरकुल) योजनेचा लाभ अधिकाधिक गरजू नागरिकांपर्यंत पोहोचावा, यासाठी शासनाकडून प्रयत्न होत असतानाच, अर्जदारांच्या मालकी हक्काच्या अडचणीमुळे अनेक पात्र लाभार्थी वंचित राहतात. यावर उपाय म्हणून पाटोदा येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी महत्त्वपूर्ण मागणी केली आहे.अनेक कुटुंबांमध्ये राहण्याची जागा वडिलांच्या नावावर असते, तर घरकुल योजनेसाठी अर्ज करणारा मुलगा असतो. मात्र मालकी हक्क नसल्यामुळे अर्ज नाकारले जातात. या परिस्थितीत जर वडिलांनी संमतीपत्र दिले असेल, तर नगरपंचायतीने तो स्वीकारून मुलाला घरकुल मंजूर करावे, अशी मागणी गणेश शेवाळे यांनी केली आहे.यामुळे अनेक गरजू कुटुंबांना या योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ मिळू शकेल आणि त्यांचे स्वप्नातील घर प्रत्यक्षात येऊ शकेल यामुळे या मागणीला स्थानिक नागरिकांचा खुप पाठिंबा असून,पाटोदा नगरपंचायतीने सकारात्मक भूमिका घेऊन लवकर हा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी केली आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
गुरूवार, दि.१७ एप्रिल २०२५ । पान ७

# तुळापूरच्या खंडोबा देवस्थानची जमीन विकण्याचा डाव; मंदिराच्या पुजाऱ्याचा आरोप

कोरेगाव भीमा । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र तुळापूर (ता. हवेली) येथील नागरमलवस्ती डोंगरावरील सुमारे १२ व्या शतकातील पुरातन खंडोबा मंदिराच्या दिवाबत्तीसाठी पुजार्यांना उदरनिर्वाहासाठी देण्यात आलेली जमीन देवस्थान ट्रस्टी विकण्याच्या तयारीत असल्याचा आरोप खंडोबा मंदिरातील पुजार्यांनी केला आहे. याविरोधात या पुजार्यांनी मंदिराच्या पायथ्याला धरणे आंदोलन सुरू केले आहे.




श्रीक्षेत्र तुळापूर येथील श्री संभाजी महाराज यांच्या समाधिस्थळापासून जवळच प्राचीन काळातील श्री नागरमल खंडोबा मंदिर आहे. या देवस्थानची मांजरी बुद्रुक येथे २४ एकर, तर तुळापूर येथे २५ एकर जमीन आहे.

मंदिराचे पुजारी हे धनगर समाजाचे अशिक्षित लोक आहेत. देवस्थान ट्रस्टी धर्मादाय आयुक्तांची परवानगी न घेता परस्पर मांजरी बुद्रुक येथील शेतजमिनीचा विक्री व्यवहार करीत आहेत. काही रक्कम विसार म्हणून देखील त्यांनी स्वीकारली आहे, अशी माहिती येथील आंदोलक किसन पुजारी यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

संबंधित ट्रस्ट स्वतःचा मनमानी कारभार करत देवस्थानची जमीन लाटून ती विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याचे लक्षात आल्यानंतर स्थानिक पुजार्यांनी याविरोधात देवस्थानच्या पायथ्याशी धरणे आंदोलन सुरू केले.

संबंधित ट्रस्ट तातडीने रद्द करून नवीन अध्यक्षांची निवड करण्यात यावी तसेच देवस्थान जमिनीची विक्री करू देऊ नये, अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या. याबाबतचे निवेदन लोणीकंद पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय पुणे, मुंबई प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग मुंबई, गृहमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई, यांना लेखी स्वरूपात देण्यात आले. या वेळी आंदोलक किसन पुजारी, संपत पुजारी, गणेश बाळासाहेब पुजारी, विशाल पुजारी, शुभम पुजारी, अभिनाथ पुजारी, आकाश पुजारी, अनिल पुजारी, संजय पुजारी, रेखा रामदास पुजारी, आशा लक्ष्मण पुजारी, सुरेखा पुजारी, प्रभाकर पुजारी आदी पुजारी उपस्थित होते.न्यायालयीन कक्षेत देवस्थानच्या जमिनीसाठी गेली ३० वर्षे माझा लढा चालू आहे. त्यामुळे ही जमीन वाचली. मुळात मांजरी बुद्रुक येथील जमिनीचा ताबा कुळांकडे आहे आणि तुळापूर येथील जमिनीचा ताबा तेथील पुजार्यांकडे आहे. आमचा जमीन विकण्याचा हेतू नाही. उलट जमीन वाचविण्यासाठी आमचा लढा चालू आहे. त्यासाठी लाखो रुपये आम्ही घालवले आहेत. आमच्या पूर्वजांनीच ही जमीन देवस्थानला दान म्हणून दिली होती.

# डॉ. बिपिन सुळेंना 'सरदार पटेल युनिटी पुरस्कार'; व्यावसायिक शिक्षणातील योगदानाची दखल

पुणे : विश्वकर्मा ग्रुप - इन्स्टिट्यूट्स अँण्ड युनिव्हर्सिटी, पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बिपिन सुळे यांना 'सरदार पटेल युनिटी पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे. व्यावसायिक शिक्षणाच्या क्षेत्रातील त्यांचे भरीव योगदान, दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याच्या कार्याची दखल म्हणून त्यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान देण्यात आला.

हा पुरस्कार गोवा येथे आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण समारंभात गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक आणि खासदार तसेच ज्येष्ठ अभिनेत्री खासदार हेमा मालिनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



डॉ. बिपिन सुळे यांनी विश्वकर्मा ग्रुपच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात गेली दोन दशके नावीन्यपूर्ण आणि गुणवत्ताधिष्ठित उपक्रम राबवले आहेत. तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, डिजिटायझेशन अशा अनेक क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देणे नव्हे तर त्यांना 'फ्युचर रेडी' बनवण्यावर त्यांनी भर दिला आहे.

शिक्षण संस्थांचे फक्त प्रशासकीय व्यवस्थापन न करता त्या संस्थांमधील शैक्षणिक मूल्यवृद्धी, संशोधन आणि औद्योगिक संलग्नता वाढवण्याचे काम त्यांनी यशस्वीपणे केले आहे. हजारो विद्यार्थ्यांच्या करिअरच्या वाटा घडवण्यात आणि त्यांना उद्योगजगतात पायावर उभं करण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.'सरदार पटेल युनिटी पुरस्कार' हा राष्ट्रीय स्तरावरील एक सन्मान असून सामाजिक एकात्मता, शिक्षणातील गुणवत्ता आणि नेतृत्वगुण यांचे प्रतीक मानला जातो. डॉ. सुळे यांचा हा सन्मान शिक्षण क्षेत्रातील अनेक नवोदित नेत्यांना प्रेरणा देणारा ठरणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# गुलाबी रंगाच्या सूटकेसमध्ये विछिन्न अवस्थेत महिलेचा मृतदेह, कर्जत पुणे रेल्वेमार्गावर मोठी खळबळ

**पुणे । प्रतिनिधी**

मुंबईपासून काही अंतरावर असलेल्या ठाकरवाडी आणि जामरुंग रेल्वे स्टेशनदरम्यान रेल्वे ट्रॅकजवळ एका ट्रॉली बॅगमध्ये विच्छिन्न अवस्थेत महिलेचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे.चालत्या रेल्वेमधून ही सूटकेस खाली फेकली असावी अशी माहिती पोलीसांनी दिली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रायगडच्या कर्जत पुणे रेल्वे मार्गावर महिलेचा अस्थाव्यस्थ अवस्थेत मृतदेह आढळला आहे. एका सुटकेसमध्ये बेवारस मृतदेह आढळून आल्याने परिसरात गोंधळाचे वातावरण होते. गुलाबी रंगाच्या सुटकेस मध्ये आढळून आलेल्या मृतदेहाची पोलिसांकडून ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.



पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सकाळी ९:३० च्या सुमारास रेल्वे अधिकाऱ्यांनी ट्रॅकची तपासणी करत असताना त्यांना रेल्वे रुळांच्या बाजूला ही ट्रॉली बॅग आढळली. बॅग उघडल्यानंतर त्यामध्ये एका महिलेचा मृतदेह सापडला. यानंतर तात्काळ जीआरपी कंट्रोल, जीआरपी पुण्याचे वरिष्ठ पीआय, कर्जत सिटी पोलीस आणि खोपोली पोलीस यांना याची माहिती देण्यात आली.

सुमारे १२.४० वाजता कर्जत सिटी पोलीस ठाण्याच्या एपीआय मनीषा आपल्या पथकासह आणि लोनावळा जीआरपी कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी ट्रॉली बॅग उघडली असता त्यामध्ये लाल टी-शर्ट आणि पांढऱ्या लोअरसह एका महिलेचा मृतदेह आढळून आला. त्या महिलेचे डोके प्लास्टिकच्या पिशवीत गुंडाळलेले होते आणि तिचे हातपाय नायलॉनच्या दोऱ्यांनी बांधलेले होते असे पोलिसांनी सांगितले आहे. घटनेची गंभीरता पाहता फॉरेन्सिक पथकासह डॉक्टरांनाही घटनास्थळी बोलावण्यात आले आहे..

अधिकाऱ्यांनी सांगितले की, मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे, जेणेकरून मृत्यूचे कारण स्पष्ट होईल. पोलिसांना संशय आहे की, कदाचित कोणीतरी चालत्या ट्रेनमधून हा ट्रॉली बॅग खाली फेकला असावा. त्या ठिकाणी कोणत्या कोणत्या गाड्या जातात, त्या कोणत्या स्टेशनांवर थांबतात, याचा तपास सुरू आहे. त्या त्या स्टेशनवरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत आहेत, जेणेकरून ही बॅग घेऊन रेल्वे परिसरात कोण आलं होतं हे समजू शकेल. गेल्या काही दिवसांपासून पोलीस हरवलेल्या महिलांची माहितीही गोळा करत आहेत. मृत महिलेच्या वर्णनाशी जुळणाऱ्या मिसिंग महिलांवर पोलिसांचं लक्ष आहे. सद्यस्थितीत पोलिस मृत महिलेची ओळख पटवण्याचा प्रयत्न करत असून तपास सुरू आहे.

# प्लास्टीकची बंदुक दाखवली अन् टाकला दरोडा; पुण्यात चोरट्यांचा प्रताप

पुणे । प्रतिनिधी

सिंहगड रस्त्यावरील श्री ज्वेलर्स या सराफ पेढीतील कामगारांना खेळण्यातील नकली पिस्तुलाचा धाक दाखवून २० ते २२ तोळ्यांचे सुमारे १८ लाखांचे दागिने दरोडा टाकून चोरून नेले. या प्रकारामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी चोरट्यांवर रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंहगड रस्त्यावरील धायरीत रायकर मळा आहे. संबंधित ठिकाणी काळूबाई चौकात श्री ज्वेलर्स नावाची सराफ पेढी आहे. दुकानमालक विष्णू दहिवाल आणि कामगार मंगळवारी (दि. १५) दुकानात होते. त्या वेळी दुपारी दुकानात वर्दळ कमी असताना एक अनोळखी व्यक्ती दुकानवरून तोंडाला मास्क लावून शिरला.

त्याने सोनसाखळी दाखवा, असे दुकानमालकाला सांगितले.




त्यानंतर दुकानमालक सोनसाखळी दाखवत असतानाच आणखी दोन जण दुकानात शिरले. त्यांनी दुकानात शिरताच पिस्तुलाचा धाक दाखवून दुकानमालक व कामगाराला धमकावले. त्यानंतर दुकानातील २० ते २२ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने त्यांच्याजवळील पिशवीत टाकण्यास सांगितले.

काही मिनिटांच्या आत दागिने घेऊन पळून जाण्याच्या तयारीत दरोडेखोर असतानाच दुकानमालकाने या दरोडेखोरांना विरोध करण्याचा प्रयत्न केला. आरोपींनी या वेळी त्यांना मारहाण केली. झटापटीत पिस्तूलचा मागील भाग चोरटे मारहाण करत असताना तुटून खाली जमिनीवर पडला.आर्श्चयाची बाब म्हणजे ती खरीखुरी पिस्तूल नसून ती खेळण्यातील नकली पिस्तूल असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर घाईगडबडीत चोरटे दुचाकीवरून पसार झाले. याबाबतची घटना दुकानातील सीसीटीव्हीत कैद झाली आहे. त्यानंतर पोलिसांनी तपास करत असताना आरोपींनी त्यांच्याकडील एक दुचाकी एक किलोमीटर परिसरात सोडून तेथून पुढे दुसर्या वाहनाने प्रवास केल्याचे निष्पन्न झाले आहे.

दरम्यान, दुचाकी आणि ज्या वाहनातून चोरटे पुढे गेले, या आधारे आरोपींचा माग काढला जात आहे. या दरोडेखोरांवर नांदेड सिटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त संभाजी कदम, पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे, नांदेड सिटी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल भोस यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपासासाठी स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखेची पथके रवाना केली आहेत.

# बिबवेवाडीतील गुंड सनी जाधवसह साथीदारांना मकोका

**पुणे । प्रतिनिधी**

बिबवेवाडी भागात दहशत माजविणारा गुंड सनी जाधव याच्यासह साथीदारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्यात आली आहे. याबाबतचा आदेश पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.

सनी शंकर जाधव (वय २६, रा. चैत्रबन वसाहत, बिबवेवाडी), सलमान हमीद शेख (वय २५, रा. दिलासा अपार्टमेंट, बालाजीनगर, पुणे-सातारा रस्ता), हर्षल संतोष चव्हाण (वय १९, रा. पवळे चौक, कसबा पेठ) आणि शक्ती गुरव (रा. लातूर) अशी मकोका कारवाई करण्यात आलेल्या सराइतांची नावे आहेत. जाधव याच्यासह साथीदारांवर खुनाचा प्रयत्न, खंडणी, बेकायदा शस्त्र बाळगणे, लूट आणि दहशत माजविणे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. जाधव याच्यासह साथीदारांवर मकोका कारवाई करण्याचा प्रस्ताव बिबवेवाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर साळुंखे यांनी तयार केला होता. हा प्रस्ताव अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील, तसेच परिमंडळ पाचचे पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्याकडे पडताळणीसाठी पाठविण्यात आला होता. त्यानंतर पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी या प्रस्तावाला मंजुरी देऊन जाधव याच्यासह साथीदारांविरुद्ध मकोका कारवाई करण्याचा आदेश दिला.

# डॉ. सुश्रुत घैसासांची ट्रीटमेंट योग्य, त्यांना दोषी ठरवणं अयोग्य, तनिषा भिसे मृत्यूप्रकरणात इंडियन मेडिकल असोसिएशनचा पाठिंबा

पुणे: दिनानाथ मंगेशकर रुग्णालय गर्भवती महिला तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात इंडियन मेडिकल असोसिएशन डॉ. सुश्रुत घैसास यांच्या पाठीशी असल्याचं दिसून येत आहे. या प्रकरणात डॉ. घैसास यांची चूक नसून त्यांना दोषी ठरवणं चुकीचं असल्याचं, इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. संतोष कदम यांनी आयएमएची बाजू मांडली आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन डॉ. घैसास यांच्यासोबत असल्याचं स्पष्ट केलं आहे.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणात ट्रीटमेंट करत असलेले आणि या सगळ्या प्रकरणात समोर आलेले डॉ. सुश्रुत घैसास यांच्या पाठीशी इंडियन मेडिकल असोसिएशन उभा राहिला आहे. डॉ. घैसास यांना या सगळ्या प्रकरणात रुग्णालय प्रशासनासोबत दोषी ठरवले जात असताना आणि त्यांच्यावर आरोप केले जात असताना महाराष्ट्र इंडियन मेडिकल असोसिएशनने आपली भूमिका मांडली आहे.

महाराष्ट्र इंडियन मेडिकल असोसिएशनने आपण डॉ. घैसास यांच्यासोबत असून



त्यांच्याकडून कुठल्याही प्रकारची या प्रकरणात चूक झाली नसल्याचं महाराष्ट्र आयएमएचे अध्यक्ष डॉ. संतोष कदम यांनी सांगितलं आहे. त्यामुळे इंडियन मेडिकल असोसिएशनने सुश्रुत घैसास पूर्णपणे पाठींबा दिला आहे. डॉ. घैसास यांनी संबंधित गर्भवती महिलेला आतापर्यंत योग्य ट्रीटमेंट दिली होती, शिवाय ट्रीटमेंट देत असताना काही सूचना वेळोवेळी केल्या होत्या. मात्र, डॉक्टरांचे न ऐकता काही निर्णय संबंधित महिलेने आणि त्यांचे कुटुंबीयांनी घेतल्याने जेव्हा महिलेची प्रकृती सिरीयस झाली तेव्हा सुद्धा डॉ. घैसास यांनी महिलेला मदत करण्याची तयारी दर्शवली होती.

डॉ. घैसास यांच्यावर पैसे मागितल्याचा जो आरोप होतोय त्यावर सुद्धा आक्षेप आहे. आयएमएनए स्पष्टीकरण देताना डॉ. ऍडमिट करून घेत असताना लागणारा खर्च महिलेच्या कुटुंबासमोर ठेवला. त्यामुळे घैसास यांची कुठे या प्रकरणात चूक नसताना त्यांनी आपलं काम योग्य पद्धतीने केला असल्याचं इंडियन मेडिकल असोसिएशनचे म्हणणं आहे. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने जरी त्यांना नोटीस पाठवली असली तरी चौकशीमध्ये ते निर्दोष म्हणून सिद्ध होतील. त्यामुळे या सगळ्या प्रकरणात शासन जरी चूक कोणाची हे जरी अहवालाचा अभ्यास करून समोर आणणार असलं तरी डॉक्टर संघटना इंडियन मेडिकल असोसिएशन डॉ. घैसास यांच्या सोबत असल्याचं आयएमएने सांगितले आहे.

# वायसीएम रूग्णालय डॉक्टरांचे निवृत्ती वय वाढले

पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रूग्णालयातील अधिष्ठाता, अध्यापक, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक यांचे सेवानिवृत्तीचे वय वर्षे ५८ वरून वय वर्षे ६४ करण्यात आले आहे. त्याला शासन आदेशानुसार निवृत्तीचे वय वाढविण्यास महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे.




शासन निर्णयानुसार वायसीएम रूग्णालयातील अधिष्ठाता, अध्यापक, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक यांचे सेवानिवृत्तीचे वय वर्षे ५८ वरून ६४ वर्षे करण्यात आले आहे.

तसेच, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार शरीररचनाशास्त्र शरीरक्रियाशास्त्र, औषधशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र या विषयातील एम. एस्सी., पी.एचडी. हे अवैद्यकीय शिक्षण असलेल्या उमेदवारांना ५० टक्के पर्यंतच्या मर्यादेत अध्यापकीय पदांवर नियुक्त्या दिल्या जातात.या विषयातील अध्यापकांना देखील सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६४ वर्षे असे करण्यास आयुक्त सिंह यांनी मान्यता दिली आहे.

# 'श्री छत्रपती'च्या निवडणुकीसाठी ६०० अर्ज दाखल; आता माघारीकडे सर्वांचे लक्ष

भवानीनगर: श्री छत्रपती कारखान्याच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे ६०० अर्ज दाखल झाले आहेत. कारखान्याच्या संचालकपदासाठी इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

श्री छत्रपती कारखान्याच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी मंगळवारी (दि. १५) एका दिवसामध्ये उच्चांकी २६१ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज दाखल करण्यासाठी मंगळवारी सकाळपासूनच प्रांत कार्यालयासमोर इच्छुक उमेदवारांनी गर्दी केली होती.

७ ते १४ एप्रिलपर्यंत ३३९ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. मागील बर्याच वर्षांपासून ग्रामपंचायतीच्या निवडणुका सोडल्या, तर इतर निवडणुका झालेल्या नाहीत. श्री छत्रपती कारखान्याच्या संचालक मंडळाला मुदत संपून पाच वर्षे जास्त मिळाली. त्यामुळे बर्याच वर्षांपासून निवडणुका झालेल्या नसल्याने इच्छुक उमेदवारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे, अशी चर्चा आहे.

श्री छत्रपती कारखान्याच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होण्याची ही पहिलीच वेळ आहे. श्री छत्रपती कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, साखर संघाचे माजी अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांना मानणारा मोठा वर्ग असून, त्यांच्या कार्यकर्त्यांनी देखील मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल केले आहेत.

ज्यांचा प्रपंच चांगला आहे, ज्यांचा व्यवसाय चांगला आहे, जे कारखान्यासाठी वेळ देऊ शकतात अशांना उमेदवारी देण्याचे निकष अजित पवार यांनी लावले होते. त्यामुळे आता पृथ्वीराज जाचक यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय पॅनेलमधून नेमकी उमेदवारी कोणाला मिळते? याकडे लक्ष लागले आहे.

जिजामाता पॅनेलचे सुनील काळे यांनी १९९२ नंतर प्रथमच छत्रपती कारखान्याच्या निवडणुकीत पुन्हा एन्ट्री केली आहे. त्यांनी देखील पॅनेल उभा करण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. सुनील काळे यांच्या संपर्कातील इच्छुक सभासदांसह काही शासकीय निवृत्त अधिकारी आणि कर्मचार्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

भारतीय जनता पार्टीचे तानाजीराव थोरात यांनी देखील श्री छत्रपती कारखान्याच्या निवडणुकीत पॅनेल उभा करण्याचा चंग बांधला आहे. अजित पवार यांनी सर्वपक्षीय पॅनेलची घोषणा केल्यामुळे कारखान्याची निवडणूक बिनविरोध होईल की निवडणुकीसाठी पॅनेल उभे राहतील? याकडे आता सभासदांचे लक्ष लागले आहे. आता उमेदवारी अर्जांची छाननी असून, या छाननीमध्ये किती अर्ज टिकतात, याकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे. काही उमेदवारांना अर्ज बाद होण्याची शंका आल्याने त्यांनी दोन ठिकाणी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. कारखान्याच्या निवडणुकीसाठी काही विद्यमान संचालकांनी देखील अर्ज दाखल केलेले आहेत.

# 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रम: पुण्यात १२३ महिलांच्या तक्रारींचे निराकरण, अध्यक्षा रुपाली चाकणकरांची माहिती

पुणे । प्रतिनिधी

कालपासून महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा तीन दिवासांचा पुणे जिल्हा दौरा सुरू झाला असून महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमाअंतर्गत पुणे शहर विभागासाठी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर उपस्थित होत्या.

या उपक्रमाचा हेतू असा होता की प्रत्येक महिलेला महिला आयोगाचे कार्यालय मुंबईत असल्याने तिथे पोहचणे शक्य नसल्याने आयोग स्वत: पुणे जिल्ह्यामध्ये या उपक्रमाच्या माध्यमातून आला आहे. याचे कारण न्याय हा प्रत्येक महिलेला तिच्या दारी मिळायला हवा, हेच आमचे ध्येय असल्याचे महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी सांगितले. याविषयीची पोस्ट त्यांनी त्यांच्या एक्स या अकाउंटवरून शेअर केली आहे. या उपक्रमाला महिलांनी मोठा प्रतिसाद दिला असल्याचे देखील त्यांनी पोस्टमध्ये नमूद केले आहे.




काल झालेल्या जनसुनावणीत १२३ तक्रारींवर त्वरित कार्यवाही करण्यात आली. या तक्रारी प्रामुख्याने कौटुंबिक छळ, मालमत्ता व इतर गंभीर विषयांशी संबधित होत्या. या उपक्रमामुळे एकाच छताखाली पोलीस, प्रशासन आणि संबंधित अधिकारी उपस्थित असल्याने महिलांच्या तक्रारीवर त्वरीत निर्णय घेणे शक्य झाले.

या उपक्रमाअंतर्गत घेण्यात आलेल्या जनसुनावणी बैठकीत जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पोलिस उपायुक्त (गुन्हे) निखिल पिंगळे, आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जिल्हा महिला बालविकास अधिकारी मनिषा बिरारीस आदी अधिकारी उपस्थित होते.

पुढील जनसुनावण्या: १६ एप्रिल - जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ग्रामीण १७ एप्रिल - पिंपरी चिंचवड महिलांनी धैर्याने पुढे यावे, आयोग आपल्या सोबत आहे, असे आवाहन आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी केले.